# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यार्थी विकास विभाग

## युवा महोत्सव नियमावली

## सन २०२५—२०२६

# अनुक्रमणिका


| अ.क | तपशिल | पान क्रं. |
|---|---|---|
| 1 | युवा महोत्सव संयोजन उद्देश | 03 |
| 2 | युवा महोत्सव स्पर्धेसाठी नियम | 04 |
| 3 | युवा महोत्सव स्पर्धकांना सूचना | 05 |
| 4 | सादरीकरणाबाबत महत्वाच्या सुचना | 07 |
| 5 | जिल्हास्तरीय युवा महोत्सव नियमावली | 08 |
| 6 | जिल्हास्तरीय युवा महोत्सव स्पर्धा प्रकार | 08 |
| 7 | जिल्हास्तरीय युवा महोत्सव स्पर्धेची नियमावली | 09 |
| 8 | मध्यवर्ती युवा महोत्सव नियमावली | 16 |
| 9 | मध्यवर्ती युवा महोत्सव स्पर्धा प्रकार | 16 |
| 10 | मध्यवर्ती युवा महोत्सव स्पर्धेची नियमावली | 17 |
| 11 | युवा महोत्सवात आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धांची संक्षिप्त माहिती | 26 |
| 12 | युवा महोत्सव विभागानुसार कला प्रकार यादी | 27 |
| 13 | जिल्हास्तरीय युवा महोत्सव सर्वसाधारण विजेतेपद (GENERAL CHAMPIONSHIP) नियमावली | 28 |
| 14 | सर्वसाधारण विजेतेपद (GENERAL CHAMPIONSHIP) नियमावली | 29 |
| 15 | परिक्षकांना सुचना | 30 |
| 16 | स्पर्धक विद्यार्थ्यांना सुचना | 31 |
| 17 | संघप्रमुखांना सुचना | 31 |
| 18 | सादरीकरणाबाबत दयावयाच्या हमीपत्राचा नमुना | 32 |

# युवा महोत्सव संयोजन उद्देश

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने आणि त्यांच्यात संघ भावना निर्माण होऊन एकमेकांच्या गुण वैशिष्टयाबद्दल आदर निर्माण व्हावा तसेच सांस्कृतिक कलाप्रकारांमध्ये सर्वोकृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विद्यापीठ संघामध्ये समावेश करून त्यांना राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळावी यादृष्टीने युवा महोत्सवामध्ये विविध स्पर्धा आयोजित करण्यात येतात.

शिवाजी विद्यापीठाचा युवा महोत्सव दोन स्तरावर आयोजित करण्यात येतो. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्हयातील महाविद्यालयांकडून संयोजनाकरिता प्रस्ताव मागवणेत येतात व जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन विद्यापीठातर्फे सप्टेंबर/ऑक्टोंबर महिन्यामध्ये विद्यार्थी विकास विभागामार्फत यजमान महाविद्यालयामध्ये करण्यात येते. जिल्हास्तरीय युवा महोत्सवामधून गुणानुक्रमे निवडलेले उत्कृष्ट पाच संघ/पाच स्पर्धक आणि प्रश्नमंजुषा स्पर्धेमधील प्रत्येक जिल्हयातून गुणानुक्रमे पहिले पाच संघ मध्यवर्ती युवा महोत्सवाला निवडण्यात येतात. तसेच काही कलाप्रकारांची थेट मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये स्पर्धा घेतली जाते.

युवा महोत्सवाच्या सुनियोजित आयोजनाकरिता (जिल्हास्तरीय व मध्यवर्ती) तसेच राज्यस्तरीय, विभागीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय युवा महोत्सव/राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा यासाठी संघनिवड, प्रशिक्षण इ. च्या मार्गदर्शनासाठी व समन्वयासाठी मा. कुलगुरूंचे अध्यक्षतेखाली व नामनिर्देशनानुसार प्रतिवर्षी खालीलप्रमाणे युवा महोत्सव समितीचे गठण करण्यात येईल.

मा. कुलगुरू (अध्यक्ष)

मा. प्र—कुलगुरू

मा. कुलसचिव

मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ

मा. वित्त व लेखाधिकारी

व्यवस्थापन परिषद सदस्य (2)

प्राचार्य/प्राध्यापक (4)

संगीत व नाटयशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक (1)

युवा महोत्सव जिल्हा समन्वयक (3)

मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना

संचालक, विद्यार्थी विकास (सचिव)

# युवा महोत्सव स्पर्धेसाठी नियम

1. महाविद्यालयांनी युवा महोत्सवामध्ये सहभाग घेण्यासाठी विद्यापीठ पोर्टलवर ऑनलाईन पध्द्तीने प्रवेशिका भरावयाच्या आहेत. प्रवेश शुल्क भरल्याशिवाय यजमान महाविद्यालयामध्ये प्रवेशिका स्विकारल्या जाणार नाहीत.
2. प्रत्येक वैयक्तिक स्पर्धेसाठी रु. 100/– व प्रत्येक सांघिक स्पर्धेसाठी रु. 200/– इतके प्रवेश शुल्क भरावयाचे आहे. तरी स्पर्धेत सहभागी होणा–या प्रत्येक महाविद्यालयाने वैयक्तिक/सांघिक स्पर्धेतील सहभागी कलाप्रकारांच्या संख्येनुसार होणारी प्रवेश शुल्काची एकूण रक्कम .पेमेंट गेटवे द्वारा विद्यापीठाच्या खात्यावर जमा करावी.
3. महाविद्यालय/विद्यापीठ अधिविभाग यांनी एका वैयक्तिक स्पर्धेसाठी एकाच स्पर्धक विद्याथ्याचे किंवा विद्यार्थीनींचे नाव पाठवावयाचे आहे.
4. प्रथम कलाकारांची संपूर्ण नांवे (सुस्पष्ट), त्यानंतर विद्यार्थी साथीदारांची नांवे व त्यानंतर व्यावसायिक साथीदारांची नांवे क्रमाने घ्यावीत.
5. कलाकार व विद्यार्थी साथीदार यांचे शिकत असलेले वर्ग व जन्मतारीख प्रवेशिकेत नोंदविणे आवश्यक आहे. तसेच स्पर्धे ठिकाणी सर्व विद्यार्थ्यांचे जन्म तारखेचे पुरावे सादर करणे आवश्यक आहे. (दहावी प्रमाणपत्र/जन्मदाखला/शाळा सोडलेचा दाखला साक्षांकित झेरॉक्स प्रत)
6. संघव्यवस्थापक व प्राचार्य यांचे सादरीकरणाबाबतचे संयुक्त हमीपत्र आवश्यक आहे (सोबत नमूना जोडला आहे).
7. सादरीकरणावेळी स्टेज व्यवस्थेसाठी सादरीकरण करणा–या संघातील विद्यार्थी, साथिदार तसेच संघव्यवस्थापक यानांच परवानगी देणेत येईल.
8. **युवा महोत्सव नियमावलीनुसार ज्या–त्या स्पर्धेच्या ठिकाणी प्रत्यक्ष सादरीकरणासाठी महाविद्यालयाचा संघ सबळ कारणाअभावी वेळेत न आल्यास सदर संघाचे 5 गुण कमी करण्यात येतील व संघास प्रती स्पर्धा रक्कम रु. 1,000/– इतका दंड म्हणून आकारण्यात येईल. तसेच याबाबतचा दंड संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठाच्या बॅक खात्यावरती त्वरीत जमा करुन त्याची पावती सादर करावी. अन्यथा तो संघ स्पर्धेतून बाद ठरविण्यात येईल.**
9. **मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये एक ते पाच क्रमांक प्राप्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विद्यापीठामार्फत आयोजित विद्यापीठ संघ निवड शिबिरामध्ये उपस्थित राहणे बंधनकारक आहे.**
10. **सोबत जोडलेले सादरीकरणाबाबत दयावयाचे हमीपत्र संघाची नोंदणी करताना सर्व आवश्यकत्या सहया करुन जमा करणे अनिवार्य आहे.**

# युवा महोत्सव स्पर्धकांना सुचना

1. स्पर्धक विद्यार्थी–विद्यार्थीनीने महाविद्यालयाचे ओळखपत्र (आयडेंटीटी सर्टीफीकेट) सतत जवळ ठेवणे आवश्यक आहे. तसेच सदरचे ओळखपत्र प्राचार्याच्या सहीसह नुतनीकरण झालेले आवश्यक आहे.
2. सर्व स्पर्धक विद्यार्थी–विद्यार्थीनींनी स्पर्धेच्या ठिकाणी सर्व कार्यक्रमांना सादरीकरणासाठी दिलेल्या वेळेपूर्वी 10 मिनिटे अगोदर उपस्थित राहिलेच पाहिजे.
3. महाविद्यालयांना कोड क्रमांक आणि स्पर्धाप्रकारानुसार सादरीकरणाचे क्रम विद्यापीठ युवा महोत्सव समितीकडून स्पर्धेपूर्वी दिले जातील. स्पर्धकांना लॉटमध्ये जाहीर झालेल्या क्रमांकानेच भाग घेता येईल. ऐनवेळी यामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही.
4. **सर्व सांघिक कलाप्रकारांचा (वादविवाद, प्रश्नमंजूषा, सांघिक रचनाकृती वगळून) सारांश (सिनॉपसीस) चार प्रती मुद्रित स्वरूपामध्ये स्पर्धा सुरु होणेपूर्वी संयोजकांच्याकडे देणे आवश्यक आहे.**
5. कोणत्याही प्रकारच्या नियमबाहय वा बाधक गैर/बेशिस्त वर्तनाबद्‌दल विद्यार्थ्यांस शासन केले जाईल व त्याची माहिती संबधित प्राचार्यांना व विद्यापीठास कळविली जाईल.
6. कोणत्याही वस्तुची/वाद्यांची अगर साहित्याची मोडतोड केल्यास त्याची संबधित व्यक्तीकडून भरपाई करून घेतली जाईल.
7. संयोजकांच्या पूर्व परवानगीशिवाय स्पर्धक विद्यार्थी/विद्यार्थीनींना युवा महोत्सव परिसर सोडता येणार नाही.
8. विद्यार्थी/विद्यार्थीनींनी कोणत्याही प्रकारच्या तक्रारी, संबधित संघ व्यवस्थापक प्राध्यापकामार्फत युवा महोत्सव समितीकडे लेखी सादर कराव्यात. अन्यथा तक्रारींची दखल घेतली जाणार नाही.
9. परीक्षक मंडळाचे निर्णय सर्वांना अंतिम व बंधनकारक राहतील.
10. स्पर्धकांना दिलेले अनुक्रमांकाचे बॅचेस त्यांनी स्पर्धेच्या वेळी लावलेच पाहिजेत.
11. समूहगीत, लोककला व लोकनृत्य स्पर्धासाठी टेपरेकॉर्डर संगीत वापरता येणार नाही.
12. **नोंदणीवेळी आपल्या संघाची ऑनलाईन भरलेल्या माहितीची प्रत कलाप्रकारानुसार तीन प्रतीत संयोजकाकडे द्यावी. सदर कागदपत्रांसोबत विद्यार्थ्यांच्या ओळखपत्र, चालू वर्षातील प्रवेश पावती, दहावी प्रमाणपत्र व गतवर्षीची निकाल प्रत यांचे झेरॉक्स प्रत सादर करणे अनिवार्य आहे.**
13. जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये सहभागी संघातील कलाकार, साथीदार आणि संघव्यवस्थापक यांची **एकूण संख्या 54** पेक्षा जास्त असणार नाही.
14. **संघ व्यवस्थापक व प्राचार्य यांच्या हमीपत्राप्रमाणे जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये सहभागी कलाकाराने/संघाने स्पर्धेच्या ठिकाणी सादरीकरणासाठी वेळेत उपस्थित रहावे. सादरीकरणासाठी स्पर्धेच्या ठिकाणी कलाकाराचा/संघाचा (महाविद्यालयाचा) कोड नंबर तीन वेळा पुकारला जाईल. तीन वेळा महाविद्यालयाचा कोड पुकारुनही संबंधित कलाकार/संघ वेळेत सादरीकरणासाठी उपस्थित न राहिल्यास असा कलाकार/संघ स्पर्धेतून बाद ठरविण्यात येईल. याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.**
15. **साहित्य** – प्रत्येक स्पर्धेत भाग घेण्यासाठी लागणारी सर्व वाद्ये व इतर साहित्य स्पर्धकांनी आपल्या बरोबर आणावेत. संयोजकांकडून कोणतेही साहित्य अथवा वाद्ये पुरविली जाणार नाहीत.
16. **कपडे/बिछाने** – स्पर्धकांनी त्यांना आवश्यक असणारे कपडे व बिछाने आपल्या बरोबर आणावेत. संयोजकाकडून बिछाने पुरविले जाणार नाहीत.
17. **प्रवास खर्च** – कलाकार, साथीदार व संघव्यवस्थापक यांचा प्रवास खर्च ज्या त्या महाविद्यालयाने करावयाचा आहे.
18. **पात्रता** – प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या दि. 1 जूलै रोजी ज्याचे वय 25 वर्षाहून कमी असेल अशा शिवाजी विद्यापीठ क्षेत्रातील सर्व संलग्न महाविद्यालयातील/संस्थेतील व शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभागांमध्ये **पूर्णवेळ आणि नियमित** शिकत असणाऱ्या व कमीत कमी एक वर्ष पूर्णवेळ मुदतीच्या

वर्गातील विद्यार्थ्यांना युवक महोत्सव स्पर्धामध्ये भाग घेता येईल. प्रोव्हिजनल ॲडमिशन मान्य केले जाणार नाही (11 वी 12 च्या विद्यार्थ्यांना व्यावसायीक साथीदार म्हणून भाग घेता येईल, मात्र स्पर्धक म्हणून भाग घेता येणार नाही). तसेच सहभागी होणाऱ्या विद्यार्थी अगर विद्यार्थीनीने विद्यापीठात अगर महाविद्यालयात संस्थेत **पदवी अथवा पदवीकेसाठी प्रवेश घेऊन 7 वर्षापेक्षा अधिक काळ उलटून गेला असल्यास** अशा विद्यार्थी अगर विद्यार्थीनींना व्यावसायीक साथीदार म्हणून भाग घेता येईल, मात्र स्पर्धेत भाग घेता येणार नाही. पुर्णवेळ नोकरदार या विद्यार्थी/विद्यार्थीनींना स्पर्धक म्हणून भाग घेता येणार नाही.

19. **ओळख पत्र** – मध्यवर्ती युवा महोत्सवात भाग घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीजवळ (संघ व्यवस्थापक, स्पर्धक व साथीदार यांचे जवळ) संबधीत महाविद्यालयचे/संस्थेचे/डिपार्टमेंटचे फोटोसह प्राचार्यांच्या/विभागप्रमुखांच्या सहीचे **ओळखपत्र नुतनीकरण केलेले व चालू वर्षाची प्रवेश पावती** असल्याशिवाय स्पर्धकास कोणत्याही स्पर्धेत भाग घेता येणार नाही. मध्यवर्ती युवा महोत्सवात सहभागी होणाऱ्या महाविद्यालयाचे प्राचार्यांनी व पदव्युत्तर अधिविभागप्रमुखांनी आपल्या संघातील विद्यार्थी विद्यार्थीनींना ओळखपत्रे द्यावीत. याबाबत संघव्यवस्थापकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी.
20. **शिस्त** – स्पर्धेच्या ठिकाणी सर्व स्पर्धकांनी शिस्तीचे काटेकोर पालन करावयाचे आहे. परीक्षकांनी जाहीर केलेले निर्णय सर्वांना बंधनकारक व अंतिम असतील. कोणत्याही वादग्रस्त विषयाबाबत कोणत्याही महाविद्यालयास प्रसार माध्यमाकडे जाता येणार नाही. ते बेशिस्तीचे वर्तन समजले जाईल.
21. **संघ व्यवस्थापक**– प्रत्येक महाविद्यालय**ातील 15 विद्यार्थी संख्येपर्यंतच्या संघाबरोबर एक प्राध्यापक किंवा एक प्राध्यापिका संघ व्यवस्थापक** असणे आवश्यक आहे. त्यापुढील संख्येच्या विद्यार्थी संघाबरोबर एक प्राध्यापक व एक प्राध्यापिका असे दोनच संघ व्यवस्थापक पाठवून द्यावेत. **संघ व्यवस्थापक प्राध्यापकांनी आपल्या महाविद्यालयाचे विद्यार्थी/विद्यार्थीनी बरोबर राहणेचे असून त्यांनी आपल्या संघातील स्पर्धकांना स्पर्धेच्या ठिकाणी, नियोजित वेळेपूर्वी पोहचवण्याची व्यवस्था करावयाची आहे.** संघातील विद्यार्थी–विद्यार्थीनींनी युवा महोत्सव स्थळी नियमांचे पालन काटेकोरपणे करावयाचे असून त्याची अंमलजबजावणी संघ प्रमुख प्राध्यापक/प्राध्यापिका यांनी करावयाची आहे. तसेच त्यांनी आपला महाविद्यालयीन संघ व युवा महोत्सव संयोजन समिती यांच्यातील संपर्क अधिकारी म्हणून काम पहावयाचे आहे. मध्यवर्ती युवा महोत्सवात वैयक्तिक व सांघिक स्पर्धांच्या स्पर्धकांचा समावेश असल्यामुळे सांघिक व वैयक्तिक स्पर्धेसाठी स्वतंत्र संघ व्यवस्थापक पाठवू नयेत. ते मान्य केले जाणार नाहीत.
22. **निवास व भोजन**– युवा महोत्सवात भाग घेणाऱ्या प्रत्येक महाविद्यालयीन संघातील संघ व्यवस्थापक, विद्यार्थी स्पर्धक, साथीदार यांची निवास व भोजनाची व्यवस्था युवा महोत्सवस्थळी विनामुल्य करण्यात येईल. मात्र प्रत्येकाने आपला बिछाना बरोबर आणणे आवश्यक आहे.
23. **प्रवास खर्च**– संघ व्यवस्थापक, स्पर्धक व विद्यार्थी साथीदार यांच्या प्रवासावर होणारा खर्च ज्या–त्या महाविद्यालयांनी करावयाचा आहे.
24. **तज्ञ परिक्षक नियुक्ती**– जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवातील विविध स्पर्धांच्या परिक्षणासाठी प्रत्येक स्पर्धेसाठी कमीत कमी दोन व जास्तीत जास्त तीन तज्ञ परिक्षकांची नियुक्ती विद्यापीठ युवा महोत्सव समितीकडून करणेत येईल यामध्ये कोणासही हस्तक्षेप करता येणार नाही. पुर्वनियुक्त परिक्षक ऐनवेळी स्पर्धाठिकाणी उपस्थित न राहिल्यास सदर स्पर्धेसाठी युवा महोत्सव समिती नविन परिक्षकाची नेमणूक करेल. आवश्यकता भासल्यास परिक्षकांची संख्या कमी/जास्त करण्याचा अधिकार युवा महोत्सव समितीस असेल

25. व्यावसायिक साथीदार तंबाखू खाऊन आजूबाजूला थुंकतात असे निदर्शनास आले आहे. स्पर्धक, साथिदार, संघव्यवस्थापक तसेच व्यावसायिक साथीदारांनी धुम्रपान, मद्यपान, तंबाखूजन्य पदार्थ खाणे निषिध्द आहे. त्यांच्याकडून गैरवर्तवणूक होणार नाही याची खबरदारी स्पर्धक महाविद्यालयांनी, संघ व्यवस्थापकांनी घ्यावी. असे आढळयास संघ स्पर्धेतून बाद केला जाईल.

26. युवा महोत्सव नियमावलीनुसार ज्या–त्या स्पर्धेच्या ठिकाणी प्रत्यक्ष सादरीकरणासाठी महाविद्यालयाचा संघ सबळ कारणाअभावी वेळेत न आल्यास सदर संघाचे 5 गुण कमी करण्यात येतील व सदर संघास प्रती स्पर्धा रक्कम रु. 1,000/– इतका दंड आकारण्यात येईल. तसेच याबाबतचा दंड संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठाच्या बॅक खात्यावरती त्वरीत जमा करुन त्याची पावती सादर करावी. अन्यथा तो संघ स्पर्धेतून बाद ठरविण्यात येईल.

## सादरीकरणाबाबत महत्वाच्या सुचना

1. सर्व स्पर्धा मिळून एकूण नऊ साथीदार मान्य केले जातील
2. युवा महोत्सव स्पर्धा या वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसांठी आहेत. त्यामध्ये कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्याचा समावेश होऊ शकणार नाही. असा 11 वी/12 वी मधील विद्यार्थी हा व्यावसायिक साथीदार होईल.
3. व्यावसायिक साथीदारांची एकूण संख्या 8 पेक्षा अधिक असू नये.

   व्यावसायिक साथीदारांची नोंद विद्यार्थी अशी करू नये. केल्यास ते बेकायदेशीर मानले जाईल

# जिल्हास्तरीय युवा महोत्सव नियमावली

1. जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील प्रत्येक स्पर्धेसाठी किमान तीन प्रवेश अर्ज येणे आवश्यक आहे त्यापेक्षा कमी प्रवेशिका असल्यास ती स्पर्धा घेतली जाणार नाही व प्रवेशित संघाना मध्यवर्ती युवा महोत्सवात थेट प्रवेश दिला जाईल.
2. महाविद्यालयास प्रत्येक सांघिक स्पर्धेसाठी फक्त एकच संघ पाठविता येईल. वैयक्तिक स्पर्धेसाठी एका महाविद्यालयास एकापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना पाठविता येणार नाही. वादविवाद स्पर्धेसाठी वेगळे विद्यार्थी पाठविण्याची तरतूद आहे.
3. युवा महोत्सवातील प्रत्येक स्पर्धेसाठी वेगळया प्रवेशिका ऑनलाईन पध्दतीने भरुन कलाप्रकारानुसार **त्याची एक प्रत सर्व कागदपत्रांसहित संयोजक महाविद्यालयाकडे स्पर्धेच्या आदल्या दिवशी जमा करुन आपल्या संघाची नोंदणी करावी.** निर्धारीत मुदतीत ऑनलाईन पध्दतीने नोंदणी न केल्यास थेट पत्र/प्रवेशिका घेवून येणा–या प्रवेशिकांचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.
4. जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचा निकाल सर्व स्पर्धा संपल्यानंतर सर्व महाविद्यालयांना ई–मेल द्वारे कळविण्यात येईल. निकाल स्पर्धेच्या ठिकाणी जाहिर केला जाणार नाही.
5. **महत्वाची सुचना** – एकांकिका, मुकनाटय व समूहगीत सादर करताना भारतीय संस्कृतीचे दर्शन घडावे व त्यामधून राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम, त्याग, सत्य, कला, सामाजिक समस्या इत्यादी मुल्यांवर भर दिलेला असावा.
6. एका महाविद्यालयास **लोकनृत्य किंवा लोककला या दोन कला प्रकारापैकी एकाच कलाप्रकारात भाग घेता येईल.** यासाठी प्रवेशपत्रिकेत योग्य कलाप्रकार नोंदवावा.
7. कलाप्रकरामधील विद्यार्थी बदल करावयाचा असलेस प्राचार्यांचे सहीनिशी पत्र स्पर्धेच्या ठिकाणी विद्यापीठ प्रतिनिधींकडे जमा करणे आवश्यक आहे. **विद्यापीठ प्रतिनिधींच्या मान्यतेशिवाय कोणताही बदल केला जाणार नाही.**

## जिल्हास्तरीय युवा महोत्सव स्पर्धा प्रकार

अ. सांघिक स्पर्धा

1. लोकनृत्य (FOLK/ TRIBAL DANCE) किंवा लोककला (FOLK ART)
2. एकांकिका (ONE ACT PLAY)
3. प्रहसिका (SKIT)
4. मुकनाटय (माईम)
5. पथनाटय (STREET PLAY)
6. भारतीय समूहगीत (INDIAN GROUP SONG)
7. वादविवाद (DEBATE)
8. प्रश्नमंजुषा (QUIZ)

ब. वैयक्तिक स्पर्धा

1. एकपात्री अभिनय ( Mono Acting )
2. सुगमगायनः (भावगीत/भक्तीगीत/गझल/अभंग इ.) (LIGHT VOCAL)
3. वक्तृत्व (मराठी) (ELOCUTION MARATHI)
4. वक्तृत्व (हिंदी) (ELOCUTION HINDI)
5. वक्तृत्व (इंग्रजी) (ELOCUTION ENGLISH)

# जिल्हास्तरीय युवा महोत्सव स्पर्धेची नियमावली

1. लोकनृत्य :

प्रादेशिकदृष्टया जनसामान्यांमध्ये, विकसीत झालेले आणि परंपरेने चालत आलेले नृत्य म्हणजे लोकनृत्य होय. साधेपणा हे लोकनृत्याचे मुख्य वैशिष्टय असते. निरनिराळया धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक उत्सवप्रसंगी व्यक्तीसमुहांनी समुहाच्या श्रमपरिहारासाठी, आनंदासाठी प्राणीनृत्ये, शिकारनृत्ये, युध्दनृत्ये, प्रणयराधनपर नृत्ये, व्यवसायपर नृत्ये निर्माण केली आहेत. देशभरातील आदिवासी समुहाकडून केल्या जाणा–या लोकनृत्याखेरीज कोळी नृत्य, धनगरी नृत्य, शेतकरी नृत्य, डोल्लूकुनिता, कामसाले, गरबा, दांडिया, लास्या, चालो, पोपिर, बिहू, बगुरुम्बा, ढालनृत्य, झूमुरा, रासलिला, डंडानृत्य, बतकम्मा, कर्मा,सरहूल, रौफ, कुंडदांडी, कलबेलिया, घूमर, चक्री, पंथी, गौरमारिया, सैला, समई, देखणी, फुगडी, घोडे मोडणी, लोहो, रणप्पा, संबलपूरी, टूसा, ढाली, संथाल, भांगडा, गिददा, थली, बाल्या, बांबू, थरारा आदी अनेक लोकनृत्ये आपल्या देशात केली जातात.

1. एका महाविद्यालयाने एकच संघ पाठवावयाचा आहे.
2. भारतीय पारंपारिक समुह लोकनृत्य असावे.
3. संघ मुलांचा, मुलींचा किंवा मुला–मुलींचा असू शकेल.
4. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या कलाकारांची संख्या जास्तीत जास्त 10 व कमीत कमी 6 असावी.
5. या स्पर्धेत जास्तीत जास्त पाच विद्यार्थी/व्यावसायिक साथीदारांचा वापर करता येईल.
6. लोकनृत्याच्या प्राथमिक तयारीसाठी प्रत्येक संघाला 10 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
7. लोकनृत्य किमान 8 मिनिटांचे व कमाल 10 मिनिटांचे असावे. जास्तीचा 30 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. सादरीकरणासाठी त्यापेक्षा अधिकचा वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
8. सिनेसंगीतावर आधारीत लोकनृत्यास परवानगी नाही.
9. अश्लील व बिभत्स प्रकार लोकनृत्य सादर करणाऱ्या संघावर कडक कारवाई करण्यात येईल.
10. लोकनृत्यासाठी टेप–रेकॉर्डर/पूर्व ध्वनीमुद्रीत(टेप/कॅसेट) याचा वापर करता येणार नाही.
11. लोकनृत्याचे मुल्यमापन अस्सलता व खरेपणा, रचना व सादरीकरण, संगीत व तालबध्दता, रंगभूषा व वेशभूषा, एकूण प्रभाव या निकषानुसार होईल.
12. नृत्याचे सादरीकरण झाल्यानंतर ताबडतोब सहभागी संघानेच रंगमंच रिकामा व स्वच्छ करून देणेचा आहे.
13. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल.

2. लोककलाः

लोककला ही एक विस्तृत संकल्पना असून लोकनृत्य, लोकसंगीत, लोकनाटय, लोकसाहित्य आदी कला प्रकारांचा यात समावेश होतो. लोककला म्हणजे समूहमनाचा दृश्य–श्राव्य आविष्कार. लोकांनी, लोकांसाठी, लोकांमधून तयार केलेले आविष्कार म्हणजे लोककला. पारंपरिकता, समूहनिर्मिती, मौखिकता, सादरीकरणतील लवचिकता, काल आणि स्थल संवादित्व, उत्स्फुर्तता, सहज परकाया प्रवेश, नित्यनूतनता ही लोककलेची गुणवैशिष्टये आहेत. तर अंगणीय, प्रांगणीय, कृषीक्षेत्र, मंदिरक्षेत्र, सागरीक्षेत्रावरील लोककला असे काही लोककलेचे प्रकार सांगता येतात. विधीनाटय आणि विधीनाटयातील पुराणकथा यांना लोककलात महत्वाचे स्थान असते. थोडक्यात बहुतेक लोककला या धार्मिक विधीशी संबंधित असतात. गोंधळ, जागरण, भराड, किर्तन, लळीत, भारुड, बोहाडा, रायरंद–बहुरुपी, चित्रकथी, दशावतार, कलगी–तुरा, दंडार, खडी गंमत, पोवाडा, तमाशा या महाराष्ट्रातील प्रमुख प्रायोगिक लोककलांबरोबरच यक्षगान, वीरगणे, भूत कोला, बारदोधाम, नुईया, भाओना, निकोबारी, कुर्मी, मरदाला, छाऊ सराईकेलाई, कठपुतली, भवाई, कच्छी घोडी, छाऊ मयूरभंज, छाऊ पूरुलिया, बाऊल, गंभीरा अशा कितीतरी लोककला आज देशभर सादर होत आहेत.

1. एका महाविद्यालयाने एकच संघ पाठवावयाचा आहे.
2. भारतीय पारंपारिक समुह लोककला असावी.
3. संघ मुलांचा, मुलींचा अथवा मुलामुलींचा असू शकेल.
4. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या कलाकारांची संख्या जास्तीत जास्त 10 व कमीत कमी 6 असावी.
5. या स्पर्धेत जास्तीत जास्त पाच विद्यार्थी /व्यावसायिक साथीदारांचा वापर करता येईल.
6. लोककलेच्या प्राथमिक तयारीसाठी प्रत्येक संघाला 10 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
7. लोककला किमान 8 मिनिटांची व कमाल 10 मिनिटांची असावी. जास्तीचा 30 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. सादरीकरणासाठी त्यापेक्षा अधिकचा वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
8. सिनेसंगीतावर आधारीत लोककलेस परवानगी नाही.
9. अश्लील व बिभत्स प्रकार लोककला सादर करणाऱ्या संघावर कडक कारवाई करण्यात येईल.
10. लोककलेसाठी टेप–रेकॉर्डर/पूर्व ध्वनीमुद्रीत (टेप/कॅसेट) यांचा वापर करता येणार नाही.
11. लोककलेचे मुल्यमापन अस्सलता व खरेपणा, रचना व सादरीकरण, संगीत व तालबध्दता, रंगभूषा व वेशभूषा, एकूण प्रभाव या निकषानुसार होईल.
12. लोककलेचे सादरीकरण झाल्यानंतर ताबडतोब सहभागी संघानेच रंगमंच रिकामा व स्वच्छ करून देणेचा आहे.
13. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

<u>महत्वाची टिप : एका महाविद्यालयास लोकनृत्य किंवा लोककला या दोन कलाप्रकारापैकी एकाच कलाप्रकारात सहभाग घेता येईल. यासाठी प्रवेश पत्रिकेत कलाप्रकार नोंदवावा.</u>

3. एकांकिका :

संकल्पना – एकांकिका म्हणजे एक अंकी नाटक. एकाच अंकात सादर होणारे आणि नाटयमय घटनांचे एकसंघ आणि एकाच संदर्भात केंद्रीत असलेले नाटक म्हणजे एकांकीका. मनोरंजनसोबत सामाजिक विषयांवर भाष्य करण्यासाठी आणि विचार प्रवर्तक कथा मांडण्यासाठी एकांकीका उपयुक्त ठरते. कमी वेळात आणि एका संदर्भात सादर होणारे प्रभावी नाटक म्हणजे एकांकिका.

1. एका महाविद्यालयाने फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे.
2. संघ फक्त मुलांचा, फक्त मुलींचा किंवा मुला–मुलींचा संमिश्र असू शकेल.
3. संघातील सहभागी विद्यार्थी कलाकारांची संख्या (प्रत्यक्ष रंगमंचावरील) किमान 2 तर कमाल 9 असावी.
4. साथीदारांची संख्या 5 पेक्षा अधिक असता कामा नये. साथीदार पडद्यामागून किंवा विंगेतून आपली जबाबदारी बजावतील. ते प्रत्यक्ष रंगमंचावर येणार नाहीत. ( 5 मधील 3 व्यावसायिक साथीदार व 2 विद्यार्थी साथीदार असावेत.)
5. एकांकिका मराठी अथवा हिंदी भाषेतील स्वतंत्र संहिता असावी. एखादया नाटकाचा अंक किंवा प्रवेश एकांकिका म्हणून सादर करता येणार नाही.
6. संहितेसोबत एकांकिकेची मध्यवर्ती कल्पना (सारांश/) लिखीत स्वरुपात, सादरीकरणाच्या वेळी संयोजकांकडे सादर करणे बंधनकारक आहे. (संहिता व सारांश 4 प्रतीत सादर करावेत.)
7. लेखकाची परवानगी व संहितेचे सेंन्सॉर सर्टिफीकेट घेण्याची जबाबदारी एकांकिका सादर करणा–या महाविद्यालयाची असेल. सादरीकरणाच्या वेळी ते संयोजकांकडे सादर करणे बंधनकारक आहे. (काही कारणास्तव महाविद्यालयास लेखकाची परवानगी किंवा सेंन्सॉर सर्टिफीकेट उपलब्ध न झालेस, त्याबददलची सर्व जबाबदारी महाविद्यालयची राहिल, असे हमीपत्र प्राचार्याच्या स्वाक्षरीने, महाविद्यालयाच्या लेटर हेडवर देणे आवश्यक आहे.)

8. सादरीकरणासाठी किमान वेळ 25 मिनिटे व कमाल वेळ 30 मिनिटे देण्यात येईल. जास्तीत जास्त 30 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
9. संयोजकांच्या अंतिम उदघोषनेनंतर बेल सोबत वेळ सुरु होईल. 25 मिनिटानंतर वॉर्निंग बेल दिली जाईल. तर 30 मिनिटानंतर वेळ संपल्याची बेल दिली जाईल. (सादरीकरणापूर्वी रंगमंचावरील पूर्वतयारीसाठी 10 मिनिटापेक्षा अधिक वेळ मिळणार नाही. तसेच सादरीकरणानंतर रंगमंच रिकामा करण्यासाठी 5 मिनिटांपेक्षा अधिक वेळ मिळणार नाही.)
10. सर्वसाधारण प्रकाश योजना व सामान्यतः लागणारे फर्निचर (टेबल, खुर्ची इत्यादी) संयोजक महाविद्यालयातर्फे पुरविण्यात येईल. परंतू काही विशिष्ट साहित्य लागत असल्यास त्याची व्यवस्था संघाने स्वतःच करावी.
11. स्पर्धेचे मुल्यमापन विषयाची निवड, दिग्दर्शन, अभिनय, तांत्रिक व कलात्मक कौशल्य (नेपथ्य, प्रकाश योजना, पार्श्व संगीत, रंगभूषा, वेशभूषा), सांघिक प्रयत्न व प्रेक्षकांवरील परिणाम इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.
12. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल
13. उत्कृष्ट पुरुष / स्त्री अभिनयासाठी निवडलेल्या स्पर्धकास सन्मानचिन्ह देण्यात येईल.

### 5. प्रहसिका :

संकल्पना – स्किट म्हणजे प्रहसन किंवा प्रहसिका. एखादा प्रश्न घेवून त्याचे विनोदी ढंगाने, विडंबन किंवा उपरोधात्मक सादरीकरण करणे म्हणजे प्रहसन.

1. एका महाविद्यालयाने फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे.
2. संघ फक्त मुलांचा, फक्त मुलींचा किंवा मुला–मुलींचा संमिश्र असू शकेल.
3. संघातील सहभागी विद्यार्थी कलाकारांची संख्या (प्रत्यक्ष रंगमंचावरील) किमान 3 तर कमाल 6 असावी.
4. साथीदारांची संख्या 3पेक्षा अधिक असता कामा नये. साथीदार पडद्यामागून किंवा विंगेतून आपली जबाबदारी बजावतील. ते प्रत्यक्ष रंगमंचावर येणार नाहीत. ( 3 व्यावसायिक लोक साथीदार म्हणून वापरता येतील.)
5. प्रहसिका मराठी अथवा हिंदी भाषेत असावी.
6. संहितेसोबत प्रहसिकेची मध्यवर्ती कल्पना (सारांश / ) लिखीत स्वरुपात, सादरीकरणाच्या वेळी संयोजकांकडे सादर करणे बंधनकारक आहे. (संहिता व सारांश 4 प्रतीत सादर करावेत.)
7. लेखकाची परवानगी व संहितेचे सेंन्सॉर सर्टिफीकेट घेण्याची जबाबदारी प्रहसिका सादर करणा–या महाविद्यालयाची असेल. सादरीकरणाच्या वेळी ते संयोजकांकडे सादर करणे बंधनकारक आहे. (काही करणास्तव महाविद्यालयास लेखकाची परवानगी किंवा सेंन्सॉर सर्टिफीकेट उपलब्ध न झालेस, त्याबददलची सर्व जबाबदारी महाविद्यालयची राहिल, असे हमीपत्र प्राचार्याच्या स्वाक्षरीने, महाविद्यालयाच्या लेटर हेडवर देणे आवश्यक आहे.)
8. सादरीकरणासाठी किमान वेळ 8 मिनिटे व कमाल वेळ 10 मिनिटे देण्यात येईल. जास्तीत जास्त 30 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
9. संयोजकांच्या अंतिम उदघोषनेनंतर बेल सोबत वेळ सुरु होईल. 8 मिनिटानंतर वॉर्निंग बेल दिली जाईल. तर 10 मिनिटानंतर वेळ संपल्याची बेल दिली जाईल. (सादरीकरणापूर्वी रंगमंचावरील पूर्वतयारीसाठी 3 मिनिटापेक्षा अधिक वेळ मिळणार नाही. तसेच सादरीकरणानंतर रंगमंच रिकामा करण्यासाठी 2 मिनिटांपेक्षा अधिक वेळ मिळणार नाही.)

10. सर्वसाधारण प्रकाश योजना व सामान्यतः लागणारे फर्निचर (टेबल, खुर्ची इत्यादी) संयोजक महाविद्यालयातर्फे पुरविण्यात येईल. परंतू काही विशिष्ट साहित्य लागत असल्यास त्याची व्यवस्था संघाने स्वतःच करावी.
11. प्रहसनात राष्ट्रीय व्यक्तींवर, तत्वांवर टीका,  चरित्र किंवा चारित्र्य हनन, शारिरीक व्यंगावर टिका अशा बाबींचा समावेश असता कामा नये.
12. रंगभूषा, वेषभूषा, प्रकाश योजना व पार्श्वसंगीताचा वापर करता येईल.
13. सादरीकरणासाठी विषय ज्या त्या महाविद्यालयाने निवडावयाचा आहे. राष्ट्रीय एकात्मता, देशभक्ती, राष्ट्रप्रेम, अंधश्रध्दा निर्मुलन व सामाजिक समस्या अशा विषयांना प्राधान्य द्यावे.
14. स्पर्धेचे मुल्यमापन विषयाची निवड, अभिनय, दिग्दर्शन, अभिनय, समन्वय, सांघिक प्रयत्न व प्रेक्षकांवरील परिणाम इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.
15. अत्यंत महत्वाचे – प्रहसन विनोदी, विडंबनात्मक, उपरोधक असणे आवश्यक आहे.
16. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

### 6. मुकनाटय :

संकल्पना – मुकनाटय म्हणजे शब्द विरहीत अभिनय, हावभाव, पवित्रा आणि मुद्रा अभिनयातून अभिव्यक्त होण्याची कला आहे. एखादी कल्पना, विषय मांडणे, भावना, विचार, मत व्यक्त करणे अथवा गोष्ट सांगणे हे केवळ हावभाव, शारीरिक हालचालीतून व आकृतीबंधातून व्यक्त केले जाते. मुकाभिनेत्याला सादरीकरणासाठी कोणत्याही वस्तूचा किंवा स्टेज प्रॉपटींचा वापर करता येत नाही.

1. एका महाविद्यालयाने फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे.
2. संघ फक्त मुलांचा, फक्त मुलींचा किंवा मुला–मुलींचा संमिश्र असू शकेल.
3. संघातील सहभागी विद्यार्थी कलाकारांची संख्या (प्रत्यक्ष रंगमंचावरील) किमान 3 तर कमाल 6 असावी.
4. साथीदारांची संख्या 2 पेक्षा अधिक असता कामा नये. साथीदार पडद्यामागून किंवा विंगेतून आपली जबाबदारी बजावतील. ते प्रत्यक्ष रंगमंचावर येणार नाहीत. (  व्यावसायिक लोक साथीदार म्हणून वापरता येतील.)
5. मुकनाटयाची मध्यवर्ती कल्पना (सारांश/) लिखीत स्वरुपात, सादरीकरणाच्या वेळी संयोजकांकडे सादर करणे बंधनकारक आहे. (संहिता व सारांश 4 प्रतीत सादर करावेत.)
6. सादरीकरणासाठी किमान वेळ 4 मिनिटे व कमाल वेळ 5 मिनिटे देण्यात येईल. जास्तीत जास्त 15 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
7. संयोजकांच्या अंतिम उदघोषनेनंतर बेल सोबत वेळ सुरु होईल. 4 मिनिटानंतर वॉर्निंग बेल दिली जाईल. तर 5 मिनिटानंतर वेळ संपल्याची बेल दिली जाईल. (सादरीकरणापूर्वी रंगमंचावरील पूर्वतयारीसाठी 3 मिनिटापेक्षा अधिक वेळ मिळणार नाही. तसेच सादरीकरणानंतर रंगमंच त्वरित रिकामा करावा.)
8. सहभागी विद्यार्थी पांढ–या किंवा काळया रंगाचे शरीराला चिकटून असलेले पोशाख परिधान करतील. उंचावलेल्या भुवया आणि रुंदावलेल्या ओठांसह रंगवलेले चेहरे असावेत.
9. संकल्पना पोहोचविण्यासाठी हावभाव आणि शारिरीक हालचालींचा वापर करावा कोणत्याही वस्तूचा प्रॉपर्टीचा वापर करता येणार नाही. पार्श्वसंगीताचा वापर करता येईल.
10. स्पर्धेचे मुल्यमापन संकल्पना सादरीकरणातील कलात्मकता, आशय व आकृतीबंधाचा अर्थबोध, रंगभूषा, वेशभूषा, पार्श्वसंगीत, सांघिक समन्वय व प्रेक्षकांवरील परिणाम इत्यादी बाबींवर अवलंबून राहील
11. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल.

7. **पथनाटय** :

**संकल्पना –** पथ म्हणजे रस्ता आणि नाटय म्हणजे नाटक. म्हणजेच पथनाटय म्हणजे रस्त्यावरचे नाटक होय. पथनाटय कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी जसे की रस्ता, चौक किंवा बाजारपेठेत सादर केले जाते. यासाठी विशेष रंगमंचाची किंवा मोठया साधनसामुग्रीची आवश्यकता नसते. सामाजिक समस्या, राजकीय किंवा सांस्कृतिक विषयांवर जनजागृती करण्यासाठी पथनाटय हे प्रभावी माध्यम आहे.

1. एका महाविद्यालयाने फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे.
2. संघ फक्त मुलांचा, फक्त मुलींचा किंवा मुला–मुलींचा संमिश्र असू शकेल.
3. संघातील सहभागी विद्यार्थी कलाकारांची संख्या (प्रत्यक्ष रंगमंचावरील) किमान 6 तर कमाल 10 असावी.
4. पथनाटय मराठी अथवा हिंदी भाषेत असावी.
5. पथनाटयाच्या संहितेसोबत मध्यवर्ती कल्पना (सारांश/) लिखीत स्वरुपात, सादरीकरणाच्या वेळी संयोजकांकडे सादर करणे बंधनकारक आहे. (संहिता व सारांश 4 प्रतीत सादर करावेत.)
6. लेखकाची परवानगी व संहितेचे सेंन्सॉर सर्टिफीकेट घेण्याची जबाबदारी पथनाटय सादर करणा–या महाविद्यालयाची असेल. सादरीकरणाच्या वेळी ते संयोजकांकडे सादर करणे बंधनकारक आहे. (काही कारणास्तव महाविद्यालयास लेखकाची परवानगी किंवा सेंन्सॉर सर्टिफीकेट उपलब्ध न झालेस, त्याबददलची सर्व जबाबदारी महाविद्यालयची राहिल, असे हमीपत्र प्राचार्याच्या स्वाक्षरीने, महाविद्यालयाच्या लेटर हेडवर देणे आवश्यक आहे.)
7. सादरीकरणासाठी किमान वेळ 12 मिनिटे व कमाल वेळ 15 मिनिटे देण्यात येईल. जास्तीत जास्त 30 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
8. संयोजकांच्या अंतिम उदघोषनेनंतर बेल सोबत वेळ सुरु होईल. 12 मिनिटानंतर वॉर्निंग बेल दिली जाईल. तर 15 मिनिटानंतर वेळ संपल्याची बेल दिली जाईल.
9. महाविद्यालयाने राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय समस्या, राष्ट्रीय कल्याणकारी योजना, अंधश्रध्दा निर्मुलन व सामाजिक समस्या अशा विषयांना प्राधान्य द्यावे. पथनाटिकेत राष्ट्रीय व्यक्तींवर व तत्वावर टीका तसेच चारित्र्य हनन अशा बाबींचा समावेश असता कामा नये.
10. सादरीकरण पथनाटयाच्या पध्दतीने म्हणजे रंगभूषा, वेशभूषा, प्रकाश योजना व रेकॉर्डेड पार्श्वसंगीत नावाचे, आशयाचे फलक, प्रॉपर्टी यांचा वापर करु नये. पात्रांना वाद्य वापरण्यास, वाजविण्यास परवानगी आहे. प्रेक्षक गोलाकार चोहोबाजूला आहेत याचे भान ठेवावे. या स्पर्धा प्रकारात साथीदारांची तरतूद नाही.
11. स्पर्धेचे मुल्यमापन विषयाची निवड, अभिनय, दिग्दर्शन, अभिनय, विषयाला न्याय व सांघिक अभिव्यक्ती आणि प्रेक्षकांवरील परिणाम इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.
12. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल.

7. **भारतीय समूहगीत** :

1. एका महाविद्यालयाने फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे.
2. समूहगीत हे भारतीय भाषेमध्ये असावे.
3. या स्पर्धेत 3 साथीदारांचा वापर करता येईल.
4. साथीदार वगळून संघात कमीत कमी 4 व जास्तीत जास्त 6 स्पर्धक असतील.
5. चित्रपटातील समुहगीतास परवानगी दिली जाणार नाही.
6. संघ मुलांचा, मुलींचा अथवा मुला–मुलींचा असू शकेल.
7. गायनाचे मुल्य लक्षात घेऊनच निर्णय दिला जाईल. निर्णय वेशभूषा अथवा हावभाव यावर अवलंबून असणार नाही.

8. प्रत्येक संघाने दोन समूहगीते सादर करावयाची आहेत. त्यापैकी एक देशभक्तीपर गीत व एक भारतीय लोकगीत असलेच पाहीजे.
9. दोन समूहगीतांसाठी एकूण किमान 8 मिनिटे व कमाल 10 मिनिटे वेळ दिला जाईल. जास्तीत जास्त 30 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
10. साथीदारांनी गाणे म्हणू नये.
11. भारतीय समूहगीतासाठी टेप–रेकॉर्डर/पूर्व ध्वनीमुद्रीत (टेप/कॅसेट) यांचा वापर करता येणार नाही. की–बोर्ड, गिटार वरील म्युझिकल पॅच किंवा प्रिसेट एकाच टोन मधील असावेत.
12. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

**8. वादविवाद :**

1. स्पर्धेसाठी महाविद्यालयाचा दिलेल्या विषयाचे बाजूने एक व विरूध्द बाजूने बोलणारा एक अशा दोन विद्यार्थ्यांचा एक संघ सहभागी होईल. ही सांघिक स्पर्धा आहे.
2. या स्पर्धेत मराठी, हिंदी अथवा इंग्रजी यापैकी कोणत्याही भाषेत बोलता येईल.
3. महाविद्यालयाने या स्पर्धेसाठी स्वतंत्र प्रवेशिका व प्रवेश शुल्क भरलेले असले पाहिजे.
4. वादविवाद स्पर्धेसाठी तिन्ही जिल्हयांसाठी प्रत्येकी 1 असे वेगवेगळे विषय असतील. हे विषय ज्या–त्या जिल्हयाच्या स्पर्धेच्या आधी 2 दिवस कळविले जातील. त्याच पध्दतीने मध्यवर्तीचा विषय त्या स्पर्धेच्या आधी 2 दिवस कळविला जाईल.
5. वादविवाद स्पर्धेमध्ये प्रस्तावाच्या बाजूने व प्रस्तावाच्या विरोधात बोलण्यासाठी प्रत्येकी 5 मिनीटे वेळ आहे. अधिकचा 15 सेकंद वेळ मान्य करण्यात येईल. 4 मिनिटांपेक्षा कमी आणि 5.15 पेक्षा अधिक वेळ घेतलेला स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
6. वादविवाद स्पर्धेसाठी दोन्ही स्पर्धकांचे वेगवेगळे मुल्यांकन असेल व त्यानंतर त्या गुणांचा एकत्रित सांघिक म्हणून विचार केला जाईल.
7. वादविवाद स्पर्धेचे मुल्यमापन – विषयाचा परिचय/प्रस्तावना, मुख्य मांडणी, खंडन मंडण, तार्किक युक्तिवाद, विचारांची स्पष्टता, प्रभावी सादरीकरण, निष्कर्ष/समारोप इत्यादी निकषांच्या अनुषंगाने केला जाईल
8. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

**9. प्रश्नमंजुषा :**

1. एका महाविद्यालयाने जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे. संघात किमान 2 व कमाल 3 स्पर्धकांचा समावेश असेल. **यामध्ये किमान एक विद्यार्थीनी असणे आवश्यक.**
2. जिल्हा पातळीवर स्पर्धक विद्यार्थ्यांची प्रथम सांघिक लेखी परीक्षा घेतली जाईल. प्रत्येक संघाला एक प्रश्नपत्रिका देण्यात येईल. परीक्षेचा कालावधी एक तास असेल.
3. खालील विषयावर आधारीत लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका इंग्रजी माध्यमातून विद्यापीठात तयार केली जाईल.
   i) भारतीय इतिहास व भूगोल, ii) प्रचलित घडामोडी, iii) क्रीडा, iv) कला, साहित्य व विज्ञान, v) सामान्यज्ञान
4. जिल्हा पातळीवरील प्रश्नमंजूषा स्पर्धा जिल्हास्तरीय युवा महोत्सव दिवशीच यजमान महाविद्यालयात आयोजित केली जाईल.
5. जिल्हास्तरीय प्रश्नमंजूषा स्पर्धेत प्रत्येक जिल्हयातून गुणानुक्रमे पहिल्या 1 ते 5 क्रमांक प्राप्त संघाना मध्यवर्ती युवा महोत्सवात सहभाग घेता येईल.
6. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

10. एकपात्री अभिनय (मराठी, हिंदी आणि इंग्रजी)

**संकल्पना –** एकपात्री अभिनय म्हणजे एकाच कलाकाराने, एकाच वेळी अनेक भूमिका साकारणे. यात एकच कलाकार संवाद, हावभाव, आणि देहबोलीच्या वैविध्यातून प्रेक्षकांसमोर एकापेक्षा अधिक व्यक्तीरेखा जिवंत करतो. एखादया नाटकातील एखादया पात्राचे स्वगत सादर करणे म्हणजे एकपात्री अभिनय नव्हे. एकपात्री अभिनय स्पर्धेत स्पर्धकाने एकापेक्षा जास्त व्यक्तीरेखा सादर करणे अपेक्षित आहे.

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
2. स्पर्धकास मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेचा वापर करता येईल.
3. सादरीकरणासाठी किमान वेळ 4 मिनिटे व कमाल वेळ 5 मिनिटे देण्यात येईल. जास्तीत जास्त 30 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
4. संयोजकांच्या अंतिम उदघोषनेनंतर बेल सोबत वेळ सुरु होईल. 4 मिनिटानंतर वॉर्निंग बेल दिली जाईल. तर 5 मिनिटानंतर वेळ संपल्याची बेल दिली जाईल.
5. सादरीकरणासाठी विषय स्वतः निवडावयाचा आहे. स्वरचित एकपात्री प्रयोग किंवा एखादया नाटकातील एकापेक्षा अधिक पात्रांचा एखादा प्रसंग सादर करता येईल.
6. एकपात्री अभिनय स्पर्धेत स्वगत सादर करता येणार नाही.
7. स्पर्धेचे मुल्यमापन सादर केलेल्या व्यक्तीरेखांची संख्या, अभिनय (संवाद, हावभाव आणि देहबोलीतील वैविध्यता) व प्रेक्षकांवरील परिणाम इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.
8. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल.

11. **सुगम गायन** :

1. प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकाला भाग घेता येईल.
2. प्रत्येक स्पर्धकाला जास्तीत जास्त तीन साथीदार बरोबर घेता येईल.
3. प्रत्येक गायकाला किमान 4 मिनिटांचा व कमाल 6 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
4. स्पर्धकास जास्तीत जास्त 15 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिकचा वेळ लागल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद केला जाईल.
5. या स्पर्धेत भावगीत, भक्तीगीत, भजन, गझल आणि अभंग सादर करता येईल.
6. स्पर्धेचा निर्णय गीताची निवड, स्वर, सादरीकरण, आणि एकूण परिणाम यावर अवलंबून राहील.
7. चित्रपटातील गीतास परवानगी नसेल.
8. सुगम गायन कोणत्याही भारतीय भाषेत चालेल.
9. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

12. वक्तृत्व :

1. ही स्पर्धा मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषेत स्वतंत्रपणे आयोजित केली जाईल.
2. महाविद्यालयांना प्रत्येक भाषेतील स्पर्धेसाठी फक्त एकच स्पर्धक पाठविता येईल.
3. प्रत्येक भाषेतील स्पर्धा स्वतंत्र असल्याने प्रत्येक भाषेसाठी स्वतंत्र प्रवेशिका पाठवावी.
4. वक्तृत्वासाठी तिन्ही जिल्हयांसाठी प्रत्येकी 1 असे वेगवेगळे विषय असतील. सदर विषय ज्या–त्या जिल्हयाच्या स्पर्धेच्या आधी 2 दिवस कळविला जाईल. त्याच पध्दतीने मध्यवर्तीचा विषय त्या स्पर्धेच्या आधी 2 दिवस कळविला जाईल.
5. स्पर्धेमध्ये वक्तृत्वाची वेळ 5 मिनीटे आहे. अधिकचा 15 सेकंद वेळ मान्य करण्यात येईल. 4 मिनटांपेक्षा कमी आणि 5.15 पेक्षा अधिक वेळ घेतलेला स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
6. वक्तृत्व स्पर्धेचे मुल्यमापन – विषय ज्ञान/आशय, विचारांची स्पष्टता, मांडणी शैली, हावभाव, एकूण परिणाम इत्यादी निकषांच्या अनुषंगाने करण्यात येईल.
7. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

# मध्यवर्ती युवा महोत्सव नियमावली

विद्यार्थी विकास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर तर्फे यजमान महाविद्यालयांमध्ये संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील स्पर्धांमधून गुणानुक्रमे निवड झालेले संघ व स्पर्धक आणि काही स्पर्धांसाठी थेट प्रवेशासह मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन युवा महोत्सव समितीने मान्य केलेल्या यजमान महाविद्यालयामध्ये केले जाते.

## मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी सूचना आणि नियमावली :

1. जिल्हास्तरीय स्पर्धेत गुणानुक्रमे पाच क्रमांक पटकावलेल्या संघांनी व स्पर्धकांनी मध्यवर्ती युवा महोत्सव स्थळी वेळेवर उपस्थित रहावे. कोणत्याही परिस्थितीत स्पॉट रजिस्ट्रेशन केले जाणार नाही.
2. जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये एकांकीका, प्रहसिका, मुकनाटय पथनाटय, लोकनृत्य/लोककला, भारतीय समूहगीत व वादविवाद या सांघिक स्पर्धेत गुणानुक्रमे **पहिले पाच** क्रमांक मिळविलेल्या संघाना तसेच सुगम गायन, एकपात्री अभिनय व वक्तृत्व (मराठी, हिंदी, इंग्रजी) या वैयक्तिक स्पर्धेतील गुणाक्रमे **प्रत्येकी पाच** स्पर्धकांना आणि प्रश्नमंजुषा स्पर्धेमधील तिन्ही जिल्हयातून **प्रत्येकी पाच** संघांना मध्यवर्ती युवा महोत्सवात भाग घेता येईल. त्यामुळे या स्पर्धांसाठी पुनःश्च प्रवेशिका पाठविण्याची गरज नाही.
3. जिल्हास्तरीय सांघिक व वैयक्तिक स्पर्धांचे नियम मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या सांघिक व वैयक्तिक स्पर्धांना लागू करण्यात येतील.
4. मध्यवर्ती युवा महोत्सवात भाग घेणाऱ्या महाविद्यालयांनी थेट फक्त मध्यवर्ती युवा महोत्सवामध्येच नव्याने होणाऱ्या वैयक्तिक स्पर्धेसाठी प्रवेश अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहेत.
5. थेट फक्त मध्यवर्ती युवा महोत्सवात होणाऱ्या वैयक्तिक स्पर्धेसाठी **किमान पाच** स्पर्धकांचे प्रवेश अर्ज येणे आवश्यक आहे. त्यापेक्षा कमी स्पर्धक आल्यास ही स्पर्धा घेतली जाणार नाही.
6. युवा महोत्सव आयोजक यजमान महाविद्यालयांनी स्पर्धांचे निकाल सर्व स्पर्धा संपल्यानंतर ताबडतोब जाहीर करून ते विद्यापीठाकडे पाठवावयाचे आहेत.

## मध्यवर्ती युवा महोत्सव स्पर्धा प्रकार

## I. जिल्हास्तरीय युवा महोत्सवातून मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये प्रवेश

### अ. सांघिक स्पर्धा –

1. लोकनृत्य (प्रत्येक जिल्हयातील 5 संघ)
2. लोककला (प्रत्येक जिल्हयातील 5 संघ)
3. एकांकिका (प्रत्येक जिल्हयातील 5 संघ)
4. प्रहसिका (प्रत्येक जिल्हयातील 5 संघ)
5. मूकनाटय (प्रत्येक जिल्हयातील 5 संघ)
6. पथनाटय (प्रत्येक जिल्हयातील 5 संघ)
7. भारतीय समूहगीत (प्रत्येक जिल्हयातील 5 संघ)
8. वाद विवाद (प्रत्येक जिल्हयातील 5 संघ)
9. प्रश्नमंजूषा ( प्रत्येक जिल्हयातील 5 संघ)

### ब. वैयक्तिक स्पर्धा –

1. एकपात्री अभिनय : प्रत्येक जिल्हयातील 5 स्पर्धक
2. सुगमगायन : प्रत्येक जिल्हयातील 5 स्पर्धक
3. वक्तृत्व : (मराठी) प्रत्येक जिल्हयातील 5 स्पर्धक
4. वक्तृत्व : (हिंदी) प्रत्येक जिल्हयातील 5 स्पर्धक
5. वक्तृत्व : (इंग्रजी) प्रत्येक जिल्हयातील 5 स्पर्धक

## II. मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये थेट प्रवेश

अ) सांघिक स्पर्धा

1. पाश्चिमात्य समूहगीत (Western Group Song)
2. सांघिक रचनाकृती (Instalation)
3. लघुपट (Short Film)
4. लोकसंगीत वाद्यवृंद (FOLK ORCHESTRA)
5. शोभायात्रा (Rally)

ब) वैयक्तिक स्पर्धा

1. शास्त्रीय नृत्य (Classical Dance)
2. नकला (MIMICRY)
3. नाटयसंगीत (Natyasangeet Vocal)
4. शास्त्रीय गायन (Classical Vocal)
5. पाश्चिमात्य एकलगायन (Western Solo)
6. शास्त्रीय सुरवाद्य (Classical Instumental Solo-Non Percussion) हिंदूस्थानी
7. शास्त्रीय तालवाद्य (Classical Instumental Solo-Percussion) हिंदूस्थानी
8. पाश्चिमात्य एकल वाद्यवादन ( Western Instrumental)
9. स्थळ चित्र (On the Spot Painting)
10. व्यंगचित्र (Cartooning)
11. भित्तीचित्र निर्मिती (Poster Making)
12. कातरकाम (Collage)
13. स्थळ छाया चित्रण ( Spot Photography )
14. मातीकाम मातीपासून प्रतिकृत्ती निर्मिती ( Clay Modelling )
15. रांगोळी (Rangoli )
16. मेहेंदी रचना (Mehandi )
17. एकल लोकवाद्य वादन ( SOLO FOLK Instrumental)

## मध्यवर्ती युवा महोत्सव स्पर्धेची नियमावली

अ) सांघिक स्पर्धा

1. **लोकनृत्य**
   प्रत्येक जिल्हयामधून गुणानुक्रमे पहिले 5 क्रमांक मिळविलेले संघ भाग घेतील. स्पर्धेचे इतर नियम जिल्हास्तरीय स्पर्धेप्रमाणे असतील
2. **लोककला**
   प्रत्येक जिल्हयामधून गुणानुक्रमे पहिले 5 क्रमांक मिळविलेले संघ भाग घेतील. स्पर्धेचे इतर नियम जिल्हास्तरीय स्पर्धेप्रमाणे असतील.
3. **एकांकिका**
   प्रत्येक जिल्हयामधून गुणानुक्रमे पहिले 5 क्रमांक मिळविलेले संघ भाग घेतील. स्पर्धेचे इतर नियम जिल्हास्तरीय स्पर्धेप्रमाणे असतील.
4. **प्रहसिका**
   प्रत्येक जिल्हयामधून गुणानुक्रमे पहिले 5 क्रमांक मिळविलेले संघ भाग घेतील. स्पर्धेचे इतर नियम जिल्हास्तरीय स्पर्धेप्रमाणे असतील.

5. **मुकनाटय**
प्रत्येक जिल्हयामधून गुणानुक्रमे पहिले 5 क्रमांक मिळविलेले संघ भाग घेतील. स्पर्धेचे इतर नियम जिल्हास्तरीय स्पर्धेप्रमाणे असतील.

6. **पथनाटय**
प्रत्येक जिल्हयामधून गुणानुक्रमे पहिले 5 क्रमांक मिळविलेले संघ भाग घेतील. स्पर्धेचे इतर नियम जिल्हास्तरीय स्पर्धेप्रमाणे असतील.

7. **भारतीय समुहगीत**
प्रत्येक जिल्हयामधून गुणानुक्रमे पहिले 5 क्रमांक मिळविलेले संघ भाग घेतील. स्पर्धेचे इतर नियम जिल्हास्तरीय स्पर्धेप्रमाणे असतील.

8. **वादविवाद**
प्रत्येक जिल्हयामधून गुणानुक्रमे पहिले 5 क्रमांक मिळविलेले संघ भाग घेतील. स्पर्धेचे इतर नियम जिल्हास्तरीय स्पर्धेप्रमाणे असतील.

9. **पाश्चिमात्य समूहगीत**

1. सर्व जिल्हयातील इच्छूक महाविद्यालये या स्पर्धेमध्ये थेट भाग घेऊ शकतील.
2. एका महाविद्यालयाचा एकच संघ असेल.
3. समूहगीत इंग्रजी भाषेत असावे.
4. संघ मुलांचा, मुलींचा किंवा मुलामुलींचा संमिश्र असू शकेल.
5. पूर्व ध्वनिमुद्रीत (टेप/कॅसेट) अशा संगीताचा वापर करता येणार नाही.
6. गायनाचे मूल्य लक्षात घेऊनच मुल्यमापन केले जाईल, ते वेशभूषा, पोषाख, अथवा हावभाव यावर अवलंबून असणार नाही.
7. समूहगीतास किमान 8 मिनिटांचा व कमाल 10 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
8. जास्तीत जास्त 30 सेकंदांचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल, त्यापेक्षा अधिकचा वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
9. या स्पर्धेत 3 साथीदारांचा वापर करता येईल. साथीदार वगळून संघात कमीत कमी 4 व जास्तीत जास्त 6 स्पर्धक असतील.
10. गायक स्पर्धक वाद्ये वाजवू शकतात.
11. कि–बोर्ड, ऑक्टोपॅड, गिटार वरील म्युझिकल पॅच किंवा प्रीसेटस हे एकच टोनमधील असावेत.
12. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

10. **लोकसंगीत वाद्यवृंद** :

1. एका महाविद्यालयाने फक्त एकच संघ पाठवावयाचा आहे.
2. लोकवाद्यवृंदामध्ये जास्तीत जास्त 9 व कमीत कमी 6 सहभागी कलाकार आणि 3 विद्यार्थी/व्यावसायिक साथीदार असतील.
3. संघामध्ये असणारे व्यावसायिक साथीदार हे सहभागी कलाकारांपेक्षा वेगळया वेशभूषेमध्ये असतील, ज्यायोगे व्यावसायिक साथीदार आणि सहभागी विद्यार्थी कलाकार सहज ओळखता येतील.
4. व्यावसायिक साथीदार हे स्वतंत्र बसतील आणि ते कोणत्याही प्रकारे मुख्य भूमिकेमध्ये नसतील.
5. संघ मुलांचा, मुलींचा अथवा मुला–मुलींचा असू शकेल.
6. वाद्ये लावणेसाठी प्रत्येक संघाला 10 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
7. सादरीकरणासाठी किमान 8 मिनिटे व कमाल 10 मिनिटे वेळ दिला जाईल. जास्तीत जास्त 30 सेकंद वेळ मान्य करता येईल. यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
8. लोकसंगीत वाद्यवृंद हा भारतातील कोणत्याही लोकसमूहाचे संगीत वाजवू शकतील जे कोणत्याही चित्रपटामधील असू नये.
9. सादरीकरणावेळी सहभागी स्पर्धेकांनी गायन व नृत्य सादर करु नये.
10. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

## 11. सांघिक रचनाकृती

1. स्पर्धेचा विषय स्पर्धेच्या ठिकाणी देण्यात येईल.
2. रचनाकृती 5 फूट x 5 फूट या जागेच्या आत करावी
3. स्पर्धकांनी स्पर्धेसाठी लागणारे साहित्य स्वतः आणावे.
4. स्पर्धकांनी परिसरात उपलब्ध असणाऱ्या टाकावू वस्तूंचा वापर करावा.
5. या स्पर्धेत किमान 3 व कमाल 4 स्पर्धकांचा समावेश असेल.
6. या स्पर्धेत बाजारातील तयार वस्तूंचा व कलाकृतीचा वापर करता येणार नाही
7. स्पर्धेसाठी 2 तास 30 मिनिटे वेळ दिला जाईल.
8. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

## 12. प्रश्नमंजूषा

1. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हा पातळीवरील स्पर्धेमध्ये भाग घेवून गुणानुक्रमे 1 ते 5 क्रमांक प्राप्त संघांना मध्यवर्ती प्रश्नमंजूषा स्पर्धेत भाग घेता येईल.
2. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या संघात किमान दोन व कमाल तीन स्पर्धक विद्यार्थी भाग घेतील. त्यामध्ये किमान एक विद्यार्थीनी असणे आवश्यक आहे.
3. मध्यवर्ती युवा महोत्सवात भाग घेणाऱ्या स्पर्धक संघाची परीक्षा तोंडी स्वरूपाची असेल व यावेळी दृकश्राव्य (Audio-Visual) साधनांचा सुध्दा वापर करण्यात येईल.
4. मध्यवर्ती युवा महोत्सवात भाग घेणाऱ्या संघातील स्पर्धकांना स्पर्धेच्यावेळी स्पर्धेबाबत अधिकची माहिती देण्यात येईल.
5. स्पर्धेचे प्रश्न इंग्रजी माध्यमातून भारतीय इतिहास, चालू घडामोडी, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, क्रिडा, कला, साहित्य, व विज्ञान अशा विषयांवर आधारीत असतील.
6. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

## 13. लघुपट

1. प्रत्येक महाविद्यालयाकडून एकच लघुपट सादर करता येईल.
2. प्रत्येक सहभागी महाविद्यालयाने मध्यवर्ती युवा महोत्सवाचे नोंदणी प्रक्रियादरम्यान नोंदणी टेबलवर एक लघुपट पेनड्राईव्ह मधून सादर करावा.
3. सहभागी महाविद्यालये कोणत्याही विषयावर/थीमवर लघुपट तयार करु शकतात.
4. सहभागी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लघुपटातील सर्व प्रमुख/बाजूच्या भुमिका केल्या पाहिजेत. तसेच कामगिरी व निर्मितीसाठी विद्यार्थ्यांच्या संख्येवर कोणतेही बंधन असणार नाही.
5. सहभागी महाविद्यालयाने लघुपट सादर करण्यासाठी संबंधित घटकाकडून आवश्यक ती परवाणगी घेण्याची जबाबदारी सहभागी महाविद्यालयाची असेल. तसेच याबाबतचे परवानगीचे पत्र लघुपट सादर करताना सहभागी महाविद्यालयाने जमा करावयाचे आहे.
6. स्पर्धा चित्रपटाच्या संकल्पनेवर आधारित आहे त्यामुळे कोणताही माहितीपट स्विकारला जाणार नाही.
7. लघुपटाचा आशय/संवाद/गीत/संगीत हे कोणत्याही व्यक्ती, समाज, धर्म इत्यादींच्या भावना दुखवतील अशा प्रकारचा असू नये.
8. लघुपटाचा कालावधी 5 मिनिटांपेक्षा जास्त नसावा. कालमर्यादा ओलांडलेला लघुपट नाकारला जाईल. किमान लांबी 30 सेकंद असावी.
9. लघुपट हा भारताच्या कोणत्याही प्रादेशिक/अधिकृत भाषेत असेल परंतू जेव्हा तो मराठी व हिंदी व्यतिरिक्त इतर भाषेत असेल तेव्हा त्याचे उपशीर्षक मराठी व इंग्रजी भाषेमध्ये असावे.
10. सहभागी महाविद्यालयाने लघुपटामध्ये प्रायोजकांचा उल्लेख क्रेडिट लिस्टमध्ये करु नये.
11. इतर कोणत्याही स्पर्धा/महोत्सवासाठी यापूर्वी सादर केलेला लघुपट या युवा महोत्सवासाठी विचारात घेतला जाणार नाही. नंतर तसे आढळल्यास ते अपात्र ठरवले जाईल आणि त्यांचे बक्षीस काढून घेतले जाईल.

12. लघुपट हा MPEG4 किंवा AVI फॉरमेंटमध्ये शूट करावी. त्यांची गुणोत्तर 16:9 / 16:9 उच्च ॲनामॉर्फिक DV/HDV मध्ये असावी.
13. विद्यार्थी दिग्दर्शन, पटकथा लेखन, संवाद लेखन, गीत, संगीत दिग्दर्शन, कॅमेरा शूटिंग, लाईट, कला दिग्दर्शन, संपादन इत्यादी करु शकतात किंवा ते यासाठी बाहेरील व्यक्तींना आमंत्रित करु शकतात. परंतू विद्यार्थ्यांनी दिग्दर्शन, पटकथा लेखन, संवाद लेखन, गीत, संगीत दिग्दर्शन, कॅमेरा शूटिंग, लाईट, कला दिग्दर्शन, संपादन इत्यादी कामे केली असल्यास योग्य श्रेय दिले जाईल.
14. आयोजकांनी कोणत्याही स्तरावर लघुपट प्रदर्शित करण्याचे आणि त्याचे गैर व्यावसायिक साथीदार ठरविण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. तसेच कोणत्याही प्रसिध्द राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवाला किंवा स्पर्धा / स्पर्धेत चित्रपटाची प्रवेशिका पाठविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.
15. कोणत्याही तृतीय पक्षाद्वारे सामग्रीच्या कोणत्याही अनधिकृत वापरासाठी आयोजकांना जबाबदार धरले जाणार नाही आणि ते कोणत्याही सामग्रीच्या पोस्टिंगची हमी देत येत नाही.
16. लघुपट एकदा निवडला आणि तो सबमिट केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत ती मागे घेण्याची परवानगी दिली जाणार नाही.
17. सादर केलेल्या सर्व लघुपटांच्या स्क्रीनचे आयोजन यजमान महाविद्यालयाकडून करण्यात येईल.
18. मुल्यमापन सामग्रीची मैलिकता (कथा आणि स्क्रिप्टची गुणवत्ता), उत्पादन (कॅमेरा कार्य, प्रकाश आणि शॉट रचना), पोस्ट–प्रोडक्शन (संपादन, संक्रमण, पेसिंग, सातत्य आणि प्रवाह), प्रतिमा (फोकस, रंग आणि प्रकाश) आणि आवाज गुणवत्ता (स्पष्टता, ऑडिओ पातळीची सुसंगतता आणि आवाजाचा अभाव) यावर आधारित असेल.
19. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

14. शोभायात्रा :

1. बक्षिस समारंभ कार्यक्रमादिवशी सकाळी ८.३० ते १०.०० या वेळेत शोभयात्रा आयोजित केली जाईल.
2. शोभायात्रा स्पर्धेमध्ये नोंदणी केलेले सर्व विद्यार्थी, साथीदार यांना भाग घेता येईल.
3. सहभागी संघाने शोभायात्रेमध्ये राष्ट्रीय / सामाजिक महत्व या विषयांवर किंवा सांस्कृतिक परंपरा याचे सादरीकरण करावे.
4. मुल्यांकन थीम, पोशाख, सादरीकरण, एकूण परिणाम इत्यादीवर अवलंबून असेल.
5. सादरीकरणासाठी किमान 4 मिनिटे व कमाल 5 मिनिटे वेळ दिला जाईल. जास्तीत जास्त 30 सेकंद वेळ मान्य करता येईल. यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
6. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

## ब. वैयक्तीक स्पर्धा

1. **वक्तृत्वः मराठी**
   प्रत्येक जिल्हयामधून गुणानुक्रमे मराठी भाषेतून पहिले 5 क्रमांक मिळविलेले स्पर्धक भाग घेतील. स्पर्धेचे इतर नियम जिल्हास्तरीय स्पर्धेप्रमाणे असतील.
2. **वक्तृत्वः हिंदी**
   प्रत्येक जिल्हयामधून गुणानुक्रमे हिंदी भाषेतून पहिले 5 क्रमांक मिळविलेले स्पर्धक भाग घेतील. स्पर्धेचे इतर नियम जिल्हास्तरीय स्पर्धेप्रमाणे असतील.
3. **वक्तृत्वः इंग्रजी**
   प्रत्येक जिल्हयामधून गुणानुक्रमे इंग्रजी भाषेतून पहिले 5 क्रमांक मिळविलेले स्पर्धक भाग घेतील. स्पर्धेचे इतर नियम जिल्हास्तरीय स्पर्धेप्रमाणे असतील.
4. **एकपात्री अभिनय**
   प्रत्येक जिल्हयामधून गुणानुक्रमे पहिले 5 क्रमांक मिळविलेले स्पर्धक भाग घेतील. स्पर्धेचे इतर नियम जिल्हास्तरीय स्पर्धेप्रमाणे असतील.

### 5. एकल लोकवाद्य वादन :

1. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील कोणत्याही भागातील लोकवाद्याचा समावेश असावा.
2. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल .
3. स्पर्धकाने त्यांच्या बरोबर स्वतःचे वाद्य आणावे.
4. भाग घेणाऱ्या स्पर्धकाने त्यांला लागणारे साहित्य स्वतः आणावे.
5. स्पर्धकास किमान 6 मिनिटांचा व कमाल 8 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
6. जास्तीत जास्त 15 सेकंदांचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल, त्यापेक्षा अधिकचा वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
7. स्पर्धेकास दोन साथीदार घेण्यास परवानगी आहे.
8. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

### 6. शास्त्रीय नृत्य

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. स्पर्धकाने आपल्या बरोबर जास्तीत जास्त पाच साथीदार आणावेत (साथीदाराऐवजी प्रसंगी पूर्व ध्वनिमुद्रीत/रेकार्डेड संगीताचा वापर करता येईल)
3. भरत नाटयम, कथ्थक, कुचिपुडी, मोहिण्णीअट्टम, ओडिसी, कथकली किंवा मणिपुरी या नृत्यापैकी एक नृत्य प्रकारचा अविष्कार स्पर्धकास किमान 12 मिनिटे व कमाल 15 मिनिटे दाखविता येईल.
4. जास्तीत जास्त 15 सेकंदाचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल, त्यापेक्षा अधिकचा वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
5. प्राथमिक तयारीसाठी 5 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
6. चित्रपटातील शास्त्रीय नृत्य स्पर्धेत सादर करता येणार नाही.
7. साथीदारांसह शास्त्रीय नृत्य सादरीकरणास जादाचे 5 गुण दिले जातील.
8. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

### 7. नकला

**संकल्पना –** नकला किंवा मिमिक्री म्हणजे आवाज, हावभाव आणि देहबोलीतून एखाद्या यंत्राची, प्राण्याची किंवा व्यक्तीची हूबेहूब नक्कल करणे होय. पशुपक्षांचे, यंत्राचे, प्रसिध्द व्यक्तींचे हूबेहुब आवाज काढणे, त्यांच्या शारीरिक लकबी दाखवणे म्हणजेच नकला किंवा मिमिक्री होय.

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
2. स्पर्धकास मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेचा वापर करता येईल.
3. सादरीकरणासाठी किमान वेळ 4 मिनिटे व कमाल वेळ 5 मिनिटे देण्यात येईल. जास्तीत जास्त 15 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
4. संयोजकांच्या अंतिम उदघोषनेनंतर बेल सोबत वेळ सुरु होईल. 4 मिनिटानंतर वॉर्निंग बेल दिली जाईल. तर 5 मिनिटानंतर वेळ संपल्याची बेल दिली जाईल.
5. स्पर्धकास विविध यंत्र, पशु, पक्षी आणि प्रसिध्द व्यक्तीरेखांच्या आवाजाची नक्कल करता येईल. तसेच राजकीय नेते, चित्रपट सृष्टीतील व्यक्तीमत्वांची नक्कल करता येईल.
6. स्पर्धेचे मुल्यमापन नक्कल कौशल्य, आवाजाची विविधता, सादर केलेल्या व्यक्तीरेखांची संख्या आणि समानता व सादरीकरण इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.
7. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल.

### 8. सुगम गायन

प्रत्येक जिल्हयामधून गुणानुक्रमे पहिले पाच क्रमांक मिळविलेले स्पर्धक भाग घेतील. स्पर्धेचे इतर नियम जिल्हास्तरीय स्पर्धेप्रमाणे असतील.

### 9. नाटयसंगीत गायन

1. सदर स्पर्धेत एका महाविद्यालयातून फक्त एका विद्यार्थी स्पर्धकास भाग घेता येईल.
2. विद्यार्थ्यांने कोणत्याही भारतीय नाटय विभागातून गीत/नाटयपद सादर करावे.
3. गीत/नाटयपद नाटयगीत शैलीचे असावे. इतर कोणत्याही प्रकारचे गाणे (ओवी किंवा भावगीत) नाटयगीत म्हणून गाता येणार नाही
4. नाटयगीत गायनाची वेळ हि किमान 5 मिनिटे आणि कमाल 7 मिनिटांची असेल. जास्तीत जास्त 15 सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
5. आयोजकाच्या अंतिम घोषणेनंतर वेळ चालू होईल.
6. साथीदाराची संख्या जास्तीत जास्त 3 असेल.
7. संगीत नाटकातील पण चित्रपटात वापरलेली नाटयगीते सादर करता येतील.
8. स्पर्धेचे मुल्यमापन सूर, ताल आणि एकूण परिणाम या बाबींवर अवलंबून राहील.
9. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

### 10. शास्त्रीय गायन

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. स्पर्धकाला आपल्या बरोबर जास्तीत जास्त 3 साथीदार बरोबर घेता येतील.
3. प्रत्येक गायकाला किमान 8 मिनिटांचा व कमाल 10 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
4. जास्तीत जास्त 15 सेकंदांचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल त्यापेक्षा अधिकचा वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
5. या स्पर्धेत फक्त हिंदूस्तानी संगीतातील राग सादर करता येतील.
6. चित्रपटातील गीतास परवानगी नसेल.
7. स्पर्धेचे मुल्यमापन गीताची निवड, स्वर, सादरीकरण आणि एकूण परिणाम यावर अवलंबून राहील.
8. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

11. पाश्चिमात्य एकल गायन

1. स्पर्धेसाठी प्रत्येक महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. स्पर्धकाला आपल्या बरोबर जास्तीत जास्त 3 साथीदार (विद्यार्थी/व्यावसायिक) घेता येतील.
3. प्रत्येक गायकाला किमान 4 मिनिटांचा कमाल 6 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
4. जास्तीत जास्त 15 सेकंदांचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल, त्यापेक्षा अधिकचा वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
5. स्पर्धेचे मुल्यमापन गीताची निवड, स्वर, सादरीकरण आणि एकूण परिणाम यावर अवलंबून राहील.
6. गायन इंग्रजी भाषेत असावे.
7. स्पर्धकाला स्वतः वाद्य वाजवून गायन करता येईल.
8. स्पर्धक एकापेक्षा जास्त गाणी सादर करु शकतो.
9. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

12. शास्त्रीय सूरवाद्य

1. सुर वाद्यामध्ये सतार, सरोद, व्हायोलिन, हार्मोनियम व बासरी आदी वाद्यांचा समावेश आहे.
2. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
3. स्पर्धकाला आपल्या बरोबर जास्तीत जास्त 3 साथीदार (विद्यार्थी/व्यावसायिक) घेता येतील.
4. स्पर्धकांनी त्यांच्या बरोबर स्वतःची वाद्ये आणावीत.
5. भाग घेणाऱ्या स्पर्धकानी त्यांना लागणारे साहित्य व साथीदार बरोबर आणावेत.
6. स्पर्धकास किमान 8 मिनिटांचा व कमाल 10 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
7. जास्तीत जास्त 15 सेकंदांचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल, त्यापेक्षा अधिकचा वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
8. स्पर्धेचे मुल्यमापन लय, ताल, सुरेलपणा व सादरीकरण इ. बाबीवर अवलंबून राहील.
9. पाश्चिमात्य वाद्ये जी भारतीय राग पध्दतीमध्ये स्विकृती केली गेली आहे अशी वाद्ये वापरता येतील.
10. या स्पर्धेत फक्त हिंदूस्तानी संगीतातील राग सादर करता येतील.
11. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

13. शास्त्रीय तालवाद्य

1. या स्पर्धेसाठी तबला, पखवाज आदी वाद्यांचा समावेश असावा.
2. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
3. स्पर्धकाला आपल्या बरोबर जास्तीत जास्त 3 साथीदार (विद्यार्थी/व्यावसायिक) घेता येतील.
4. स्पर्धकांनी त्यांच्या बरोबर स्वतःची वाद्ये आणावीत.
5. भाग घेणाऱ्या स्पर्धकानी त्यांना लागणारे साहित्य व साथीदार बरोबर आणावेत.
6. स्पर्धकास किमान 8 मिनिटांचा व कमाल 10 मिनिटांचा वेळ दिला जाईल.
7. जास्तीत जास्त 15 सेकंदांचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल, त्यापेक्षा अधिकचा वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
8. स्पर्धेचे मुल्यमापन लय, ताल, सुरेलपणा व सादरीकरण इ. बाबीवर अवलंबून राहील.
9. या स्पर्धेत फक्त हिंदूस्तानी संगीतातील ताल सादर करता येतील.
10. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

14. पाश्चिमात्य एकल वादयवादन

1. एका महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
2. स्पर्धेत पाश्चिमात्य स्वरवाद्य किंवा तालवाद्य याचा वापर करुन केवळ पाश्चिमात्य संगीत सादर करता येईल.
3. स्पर्धेसाठी किमान 6 मिनिटे व कमाल 8 मिनिटे वेळ दिला जाईल.
4. जास्तीत जास्त 15 सेकंदांचा अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल, यापेक्षा अधिकचा वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
5. साथिदारांची संख्या जास्तीत जास्त 3 असेल.
6. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

15. स्थळ चित्र

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. संयोजक, स्पर्धकास ज्या ठिकाणी घेऊन जातील त्या ठिकाणी दिलेल्या विषयाप्रमाणे जाग्यावर चित्रण करावयाचे आहे.
3. चित्रासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावयाचे आहे. संयोजकामार्फत फक्त कागद पुरविला जाईल.
4. चित्राचा आकार 22'' x 15'' असेल.
5. प्रत्येक स्पर्धकाला किमान 2 तास व कमाल 2.30 तासांचा वेळ दिला जाईल
6. चित्रासाठी कोणत्याही प्रकारचे वॉटर कलर, ॲक्रॅलिक कलर इ. रंग वापरता येतील.
7. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

16. व्यंग चित्र

1. स्पर्धेसाठी प्रत्येक महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल दृ
2. स्पर्धेचा विषय स्पर्धेच्या ठिकाणीच देण्यात येईल.
3. प्रत्येक स्पर्धकाला किमान 2 तास व कमाल 2.30 तासांचा वेळ दिला जाईल.
4. चित्रासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावयाचे आहे. संयोजकामार्फत फक्त कागद पुरविला जाईल.
5. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

17. भित्तीचित्र निर्मिती

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. स्पर्धेचा विषय स्पर्धेच्या ठिकाणीच देण्यात येईल.
3. प्रत्येक स्पर्धकाला किमान 2 तास व कमाल 2.30 तासांचा वेळ दिला जाईल.
4. संयोजकामार्फत फक्त कागद पुरविला जाईल. भिंतीचित्रासाठी लागणारे ब्रश, रंग, इ, सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणावयाचे आहे.
5. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

18. कातरकाम /चिकटकला

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. स्पर्धेच्या ठिकाणी वस्तुची निर्मिती करावयाची आहे.
3. प्रत्येक स्पर्धकाला किमान 2 तास व कमाल 2.30 तासाचा वेळ दिला जाईल.
4. स्पर्धकांनी निर्मितीसाठी आवश्यक असणारे साहित्य (जूनी रंगीत पुस्तके, मॅग्झीन व फेवीकॉल इ.) स्वतः आणावयाचे आहे.
5. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

19. स्थळ छाया चित्रण

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. स्पर्धकाने स्वतःचा कॅमेरा/मोबाईल आणावयाचा आहे.
3. प्रत्येक स्पर्धकाला किमान 2 तास व कमाल 2.30 तासांचा वेळ दिला जाईल. ज्यामध्ये स्पर्धकाने तीन फोटोग्राफ्स काढणे अपेक्षित आहे.
4. काढलेल्या फोटोंबरोबर कोणत्याही प्रकारची छेडछाड उदा. मॉर्फिंग, मिक्सिंग, फोटो एनहान्सिंग इत्यादी करणाऱ्या स्पर्धकाला अपात्र केले जाईल.
5. सदर स्पर्धेदरम्यान काढलेले फोटोग्राफ्स हे शिवाजी विद्यापीठ आणि यजमान महाविद्यालय कोणत्याही कारणास्तव पूर्वसूचनेशिवाय वापरू शकते.

6. स्पर्धेचे मुल्यमापन विषयानुरूपता, निर्मितीक्षमता, तांत्रिक बाजू आणि एकूण परिणाम या बाबींवर अवलंबून असेल.
7. छायाचित्राची दिनांक व वेळ ही स्पर्धकाने काढलेल्या छाया चित्रामध्ये स्पष्टपणे दिसणे आवश्यक असेल त्यासाठी Geotaging ची व्यवस्था असणारा कॅमेरा/मोबाईल वापरावा.
8. स्पर्धेत सहभागी होताना स्पर्धकाने कॅमे–याचे मेमरी कार्ड पूर्णपणे रिक्त करणे आवश्यक आहे. अधिकच्या सूचना स्पर्धेवेळी देणेत येतील.
9. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल.

## 20. माती काम/ मातीपासून प्रतिकृती निर्मिती

1. स्पर्धसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. स्पर्धेचा विषय स्पर्धेच्या ठिकाणीच देण्यात येईल.
3. प्रत्येक स्पर्धकाला किमान 2 तास व कमाल 2.30 तासांचा वेळ दिला जाईल.
4. स्पर्धेसाठी संयोजकामार्फत फक्त माती पुरवठा केला जाईल.
5. कलाकृती प्रमाण 12 बाय 12 इंच
6. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

## 21. रांगोळी

1. स्पर्धेसाठी एका महाविद्यालयातील फक्त एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2. स्पर्धेचा विषय स्पर्धेच्या ठिकाणीच देण्यात येईल.
3. प्रत्येक स्पर्धकाला किमान 2 तास व कमाल 2.30 तासांचा वेळ दिला जाईल.
4. रांगोळीसाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी आणावयाचे आहे.
5. स्पर्धेतील रांगोळीची दृश्य रचना मुक्तहस्त, वर्णनात्मक व हेतु व्यक्त होणारी असावी (यामध्ये संस्कार भारती प्रकारची रांगोळी असू नये).
6. रांगोळीचा आकार 3 फुट X 3 फुट असावा.
7. बाकीच्या सुचना स्पर्धेच्या वेळी देण्यात येतील.
8. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

## 22. मेहेंदी रचना

1. एका महाविद्यालयातून एक स्पर्धक सहभागी होऊ शकेल.
2. स्पर्धेचा विषय स्पर्धेच्या ठिकाणीच देण्यात येईल.
3. स्पर्धेसाठी किमान 2 तास व कमाल 2.30 तासांचा वेळ दिला जाईल.
4. मेहेंदी रचनेसाठी लागणारी मेहेंदी ही स्पर्धकानेच आणावयची आहे.
5. मेहेंदी ही तळहातापासून ते दोन्ही हाताच्या पुढील बाजूला जास्तीत जास्त सहा इंचापर्यंत काढावी.
6. मेहेंदी रचनेसाठी सोबत एक विद्यार्थी/विद्यार्थीनी घेऊन यावे ज्याच्या हातावर ती रचना करावयाची आहे.
7. कोणत्याही प्रकारचे तयार ठसे किंवा उपकरणे वापरता येणार नाहीत.
8. मेहेंदी रचनेचे परिक्षण हे रेखीव, पारंपारिक व आकर्षकता या तत्वांवर केले जाईल.
9. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असेल

# युवा महोत्सवात आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धांची संक्षिप्त माहिती

| अ.क्र. | स्पर्धा | स्पर्धक (कमाल) | साथीदार (कमाल) | किमान वेळ | कमाल वेळ | अधिकचा वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| सांघिक स्पर्धा | | | | | | |
| 1 | लोकनृत्य | 10 (दहा) | 5 (पाच) | 8 मिनिटे | 10 मिनिटे | 30 सेकंद |
| 2 | लोककला | 10 (दहा) | 5 (पाच) | 8 मिनिटे | 10 मिनिटे | 30 सेकंद |
| 3 | एकांकिका | 9 (नऊ) | 5 (पाच) | 25 मिनिटे | 30 मिनिटे | 30 सेकंद |
| 4 | लघुनाटिका/प्रहसिका | 6 (सहा) | 3 (तीन) | 8 मिनिटे | 10 मिनिटे | 30 सेकंद |
| 5 | मुकनाटय | 6 (सहा) | 2 (दोन) | 4 मिनिटे | 5 मिनिटे | 15 सेकंद |
| 6 | पथनाटय | 10 (दहा) | तरतूद नाही | 12 मिनिटे | 15 मिनिटे | 30 सेकंद |
| 7 | भारतीय समुहगीत | 6 (सहा) | 5 (पाच) | 8 मिनिटे | 10 मिनिटे | 30 सेकंद |
| 8 | पाश्चिमात्य समुहगीत | 6 (सहा) | 5 (पाच) | 8 मिनिटे | 10 मिनिटे | 30 सेकंद |
| 9 | लोकसंगीत वाद्यवृंद | 9 (नऊ) | 3 (तीन) | 8 मिनिटे | 10 मिनिटे | 30 सेकंद |
| 10 | सांघिक रचनाकृती | 3 (तीन) | 4 (चार) | दोन तास | 2 1/2 तास | तरतुद नाही |
| 11 | वादविवाद | 2 (दोन) | तरतूद नाही | प्रत्येकी 5 मिनिटे | प्रत्येकी 5 मिनिटे | प्रत्येकी 15 सेकंद |
| 12 | प्रश्नमंजुषा | 3 (तीन) | तरतूद नाही | तरतूद नाही | तरतूद नाही | तरतूद नाही |
| 13 | लघुपट | मर्यादा नाही | मर्यादा नाही | 30 सेकंद | 5 मिनिटे | तरतूद नाही |
| 14 | शोभायात्रा | मर्यादा नाही | मर्यादा नाही | 4 मिनिटे | 5 मिनिटे | 30 सेकंद |
| वैयक्तीक स्पर्धा :– | | | | | | |
| 1 | शास्त्रीय नृत्य | 1 (एक) | 3 (तीन) | 12 मिनिटे | 15 मिनिटे | 15 सेकंद |
| 2 | नकला | 1 (एक) | तरतुद नाही | 4 मिनीटे | 5 मिनीटे | 15 सेकंद |
| 3 | एकपात्री अभिनय | 1 (एक) | तरतुद नाही | 4 मिनीटे | 5 मिनीटे | 15 सेकंद |
| 4 | सुगमगायन | 1 (एक) | 3 (तीन) | 4 मिनिटे | 6 मिनिटे | 15 सेकंद |
| 5 | नाटयसंगीत | 1 (एक) | 3 (तीन) | 5 मिनीटे | 7 मिनीटे | तरतूद नाही |
| 6 | शास्त्रीय गायन | 1 (एक) | 3 (तीन) | 8 मिनिटे | 10 मिनिटे | 15 सेकंद |
| 7 | पाश्चिमात्य एकल गायन | 1 (एक) | 3 (तीन) | 4 मिनिटे | 6 मिनिटे | 15 सेकंद |
| 8 | शास्त्रीय सुरवाद्य | 1 (एक) | 3 (तीन) | 8 मिनिटे | 10 मिनिटे | 15 सेकंद |
| 9 | शास्त्रीय तालवाद्य | 1 (एक) | 3 (तीन) | 8 मिनिटे | 10 मिनिटे | 15 सेकंद |
| 10 | पाश्चिमात्य एकल वादन | 1 (एक) | 3 (तीन) | 6 मिनिटे | 8 मिनिटे | 15 सेकंद |
| 11 | स्थळ चित्र | 1 (एक) | तरतुद नाही | दोन तास | अडीच तास | तरतुद नाही |
| 12 | व्यंग चित्र | 1 (एक) | तरतुद नाही | दोन तास | अडीच तास | तरतुद नाही |
| 13 | भित्तीचित्र निर्मिती | 1 (एक) | तरतुद नाही | दोन तास | अडीच तास | तरतुद नाही |
| 14 | कातरकाम | 1 (एक) | तरतुद नाही | दोन तास | अडीच तास | तरतुद नाही |
| 15 | स्थळ छायाचित्रण | 1 (एक) | तरतुद नाही | दोन तास | अडीच तास | तरतुद नाही |
| 16 | मातीकाम/माती पासून प्रतिकृती निर्मिती | 1 (एक) | तरतुद नाही | दोन तास | अडीच तास | तरतुद नाही |
| 17 | रांगोळी | 1 (एक) | तरतुद नाही | दोन तास | अडीच तास | तरतुद नाही |
| 18 | मेहेंदी रचना | 1 (एक) | 1 (एक) | दिड तास | दोन तास | तरतुद नाही |
| 19 | वक्तृत्व : मराठी | 1 (एक) | तरतुद नाही | 4 मिनीटे | 5 मिनीटे | 15 सेकंद |
| 20 | वक्तृत्व : हिंदी | 1 (एक) | तरतुद नाही | 4 मिनीटे | 5 मिनीटे | 15 सेकंद |
| 21 | वक्तृत्व : इंग्रजी | 1 (एक) | तरतुद नाही | 4 मिनीटे | 5 मिनीटे | 15 सेकंद |
| 22 | एकल लोकवाद्य वादन | 1 (एक) | 2 (दोन ) | 6 मिनिटे | 8 मिनिटे | 15 सेकंद |

# युवा महोत्सव विभागानुसार कलाप्रकार यादी

| क्रं. | नृत्य विभाग | | |
|---|---|---|---|
| 1. | लोकनृत्य | 2. | लोककला |
| 3. | शास्त्रीय नृत्य | | |

| क्रं. | नाटय विभाग | | |
|---|---|---|---|
| 1. | एकांकिका | 2. | लघुनाटिका |
| 3. | मुकनाटय | 4. | पथनाटय |
| 5. | नकला | 6. | एकपात्री अभिनय |

| क्रं. | संगीत विभाग | | |
|---|---|---|---|
| 1. | भारतीय समुहगीत | 2. | पाश्चिमात्य समुहगीत |
| 3. | लोकसंगीत वाद्यवृंद | 4. | सुगमगायन |
| 5. | शास्त्रीय गायन | 6. | पाश्चिमात्य एकल गायन |
| 7. | शास्त्रीय सुरवाद्य | 8. | शास्त्रीय तालवाद्य |
| 9. | पाश्चिमात्य एकल वादन | 10 | नाटय संगीत |
| 11. | एकल लोकवाद्य वादन | | |

| क्रं. | कला विभाग | | |
|---|---|---|---|
| 1. | सांघिक रचनाकृती | 2. | स्थळचित्रण |
| 3. | व्यंगचित्र | 4. | भित्तीचित्र निर्मिती |
| 5. | कातरकाम | 6. | स्पॉट फोटोग्राफी |
| 7. | मातीकाम | 8. | रांगोळी |
| 9. | मेहंदी रचना | 10 | लघुपट |

| क्रं. | वाङमय विभाग | | |
|---|---|---|---|
| 1. | वादविवाद | 2. | प्रश्नमंजुषा |
| 3. | मराठी वक्तृत्व | 4. | हिंदी वक्तृत्व |
| 5. | इंग्रजी वक्तृत्व | | |

| क्रं. | शोभायात्रा | | |
|---|---|---|---|
| 1. | शोभायात्रा | | |

# जिल्हास्तरीय युवा महोत्सव सर्वसाधारण विजेतेपद नियमावली

## (GENERAL CHAMPIONSHIP)

शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सवासाठी शैक्षणिक वर्ष 2025–2026 पासुन जिल्हास्तरीय सांघिक स्पर्धा व वैयक्तिक स्पर्धा प्रकारांमध्ये विजेतेपद (GENERAL CHAMPIONSHIP) देण्यात येणार आहे. याबाबतचे नियम पुढीलप्रमाणेः

1. प्रत्येक स्पर्धा प्रकारामध्ये पहिल्या पाच विजेत्या संघाना/स्पर्धकांना गुणदानाची पध्दत खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | स्पर्धेमधील गुणानुक्रम | सांघिक | वैयक्तिक स्पर्धा |
|---|---|---|---|
| 1 | प्रथम क्रमांक | 10 गुण | 5 गुण |
| 2 | व्दितीय क्रमांक | 8 गुण | 4 गुण |
| 3 | तृतीय क्रमांक | 6 गुण | 3 गुण |
| 4 | चतुर्थ क्रमांक | 4 गुण | 2 गुण |
| 5 | पाचवा क्रमांक | 2 गुण | 1 गुण |

2. सांघिक स्पर्धांतील सर्वसाधारण विजेतेपद (GENERAL CHAMPIONSHIP) ठरविताना संबंधित महाविद्यालयाच्या विजेत्या संघांनी सांघिक विभागामध्ये वरीलप्रमाणे मिळवलेले एकत्र गुण विचारात घेतले जातील त्याचप्रमाणे वैयक्तिक स्पर्धांतील सर्वसाधारण विजेतेपद (GENERAL CHAMPIONSHIP) ठरविताना संबंधित महाविद्यालयाच्या विजेत्या संघांनी वैयक्तिक विभागामध्ये वरीलप्रमाणे मिळवलेले एकत्र गुण विचारात घेतले जातील.
3. सांघिक स्पर्धा विभागातील सर्वसाधारण विजेतेपद पटकवणाऱ्या महाविद्यालयाला तसेच वैयक्तिक स्पर्धा विभागातील सर्वसाधारण विजेतेपद पटकवणाऱ्या महाविद्यालयाला फिरता चषक दिला जाईल.
4. उपरोक्त चषक वर्षभर विजेत्या महाविद्यालयाकडे राहतील. विजेतेपद विभागून दिले गेल्यास चषक एका सत्रासाठी एका महाविद्यालयाकडे आणि दुसऱ्या सत्रासाठी दुसऱ्या महाविद्यालयाकडे राहील.
5. विजेतेपद मिळवणाऱ्या महाविद्यालयाला आपल्याकडील चषकावर आपल्या महाविद्यालयाचे नाव लिहिता अथवा कोरता येणार नाही.
6. चषक प्राप्त केलेल्या महाविद्यालयांनी आपल्याकडील चषक स्वतः पुढील वर्षीच्या युवा महोत्सवापूर्वी संचालक, विद्यार्थी विकास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या कार्यालयामध्ये सुस्थितीमध्ये पोहोच करणे बंधनकारक आहे.

# सर्वसाधारण विजेतेपद नियमावली **(GENERAL CHAMPIONSHIP)**

व

# सर्वसाधारण उपविजेतेपद नियमावली **(RUNNER UP CHAMPIONSHIP)**

शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सवासाठी सांघिक स्पर्धा व वैयक्तिक स्पर्धा प्रकारांमध्ये विजेतेपद (GENERAL CHAMPIONSHIP) व सर्वसाधारण उपविजेतेपद **(RUNNER UP CHAMPIONSHIP)** देण्यात येत आहे. याबाबतचे नियम पुढीलप्रमाणेः

1. प्रत्येक स्पर्धा प्रकारामध्ये पहिल्या पाच विजेत्या संघाना/स्पर्धकांना गुणदानाची पध्दत खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | स्पर्धेमधील गुणानुक्रम | सांघिक | वैयक्तिक स्पर्धा |
|---|---|---|---|
| 1 | प्रथम कमांक | 10 गुण | 5 गुण |
| 2 | व्दितीय कमांक | 8 गुण | 4 गुण |
| 3 | तृतीय कमांक | 6 गुण | 3 गुण |
| 4 | चतुर्थ कमांक | 4 गुण | 2 गुण |
| 5 | पाचवा कमांक | 2 गुण | 1 गुण |

2. विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सव विभागवार फिरते चषक हे नृत्य, नाटय, संगीत, कला आणि वाङमय या विभागांमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा—या महाविद्यालयीन संघाला दिले जातील.
3. सांघिक स्पर्धांतील सर्वसाधारण विजेतेपद (GENERAL CHAMPIONSHIP) व सर्वसाधारण उपविजेतेपद **(RUNNER UP CHAMPIONSHIP)** ठरविताना संबंधित महाविद्यालयाच्या विजेत्या संघांनी सांघिक विभागामध्ये वरीलप्रमाणे मिळवलेले एकत्र गुण विचारात घेतले जातील त्याचप्रमाणे वैयक्तिक स्पर्धांतील सर्वसाधारण विजेतेपद (GENERAL CHAMPIONSHIP) व सर्वसाधारण उपविजेतेपद **(RUNNER UP CHAMPIONSHIP)** ठरविताना संबंधित महाविद्यालयाच्या विजेत्या संघांनी वैयक्तिक विभागामध्ये वरीलप्रमाणे मिळवलेले एकत्र गुण विचारात घेतले जातील.
4. सांघिक स्पर्धा विभागातील सर्वसाधारण विजेतेपद पटकवणाऱ्या महाविद्यालयाला फिरता **'अभिजीत कदम मेमोरियल चषक'** दिला जाईल तर वैयक्तिक सर्वसाधारण विजेतेपद पटकवणाऱ्या महाविद्यालयाला **'माजी कुलगुरु स्व. आप्पासाहेब पवार चांदीचा फिरता चषक'** दिला जाईल
5. उपरोक्त चषक वर्षभर विजेत्या महाविद्यालयाकडे राहतील. विजेतेपद विभागून दिले गेल्यास चषक एका सत्रासाठी एका महाविद्यालयाकडे आणि दुसऱ्या सत्रासाठी दुसऱ्या महाविद्यालयाकडे राहील.
6. विजेतेपद मिळवणाऱ्या महाविद्यालयाला आपल्याकडील चषकावर आपल्या महाविद्यालयाचे नाव लिहिता अथवा कोरता येणार नाही.
7. चषक प्राप्त केलेल्या महाविद्यालयांनी आपल्याकडील चषक स्वतः पुढील वर्षीच्या युवा महोत्सवापूर्वी संचालक, विद्यार्थी विकास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या कार्यालयामध्ये सुस्थितीमध्ये पोहोच करणे बंधनकारक आहे.
8. **मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये एक ते पाच कमांक प्राप्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विद्यापीठामार्फत आयोजित विद्यापीठ संघ निवड शिबिरामध्ये उपस्थित राहणे बंधनकारक आहे.**

# परीक्षकांना सुचना

1. परीक्षकांनी प्रत्येक सादरीकरणाचे मुल्यमापन स्वतःच्या सद्सद्विवेक बुध्दीने करावयाचे आहे. परीक्षकांच्या मुल्यमापनामध्ये इतर कुणीही ढवळाढवळ करणार नाही. तसे जाणवल्यास परीक्षकांनी अशी बाब युवा महोत्सव समितीच्या किंवा संचालक, विद्यार्थी विकास यांच्या निदर्शनास आणावी.
2. प्रत्येक परीक्षकांने प्रत्येक सादरीकरणाचे वस्तुनिष्ठ बारकावे (सकारात्मक/नकारात्मक) कोड नंबरनुसार स्वतंत्रपणे नोंद करुन ठेवावेत. या नोंदी बंद लखोटयातून स्वतःच्या सहीनिशी विद्यार्थी विकास विभागाकडे जमा कराव्यात.
3. संबंधित स्पर्धेच्या निकालाबाबत काही तक्रार झाल्यास किंवा वाद उद्भवल्यास सदरच्या नोंदी सह आपले मत युवामहोत्सव समिती/मा. कुलगुरु यांचे समोर सादर केले जाईल. त्यामुळे सदर स्पर्धेच्या (संबंधित कलाप्रकाराच्यां) निकालाची संपूर्ण जबाबदारी ही परीक्षकांची राहील.
4. प्रत्येक परीक्षकाने दिलेल्या नमुन्यानुसार स्वतंत्रपणे गुणपत्रक तयार करावयाचे आहे. तीन परिक्षकांपैकी एका परिक्षकांकडे एकत्रित गुणपत्रक व निकालपत्रकाचा नमुना दिला जाईल. त्याप्रमाणे वैयक्तिक गुणपत्रक, एकत्रित गुणपत्रक व निकालपत्रक यजमान महाविद्यालयाकडे जमा करण्याचे आहे.
5. Fine arts कलाप्रकारामधील कोणत्याही कलाप्रकाराची वेळ संपल्यानंतर कोड नंबरसह संपूर्ण कलाकृतीचे निरीक्षण करावे.
6. निकालपत्रक तयार करताना **जिल्हास्तरीय युवा महोत्सव मधून प्रत्येक कलाप्रकारातून फक्त प्रथम, व्दितीय व तृतीय, चतुर्थ व पाचवा क्रमांक दयावयाचे आहेत**. दोन किंवा अधिक स्पर्धकांचे समान गुण झाल्यास तीनही परीक्षकांनी चर्चा करुन, सरस/निरस सादरीकरणाचा विचार करुन गुण निश्चित करावेत.
7. **मध्यवर्ती युवा महोत्सवाचे** निकालपत्रक तयार करतानाही पाच क्रमांक देण्यात यावेत. तथापि परिक्षकांना वाटल्यास विभागून क्रमांक दिला तरी चालेल.
8. परीक्षकांनी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.
   - **i.** सादरीकरणाच्या वेळेच्या बाबतीत तसेच इतर नियमांच्या बाबतीत काटेकोर रहावे.
   - **ii.** सर्वच परिक्षकांनी संपूर्ण सादरीकरणाकडे पूर्णवेळ लक्ष दयावे. सादरीकरण सुरु असताना इतर गोष्टी /कामे करु नयेत. कला प्रकारांसाठी (**Fine Arts**) सुद्धा परीक्षक पूर्ण वेळ उपस्थित असणे आवश्यक आहे.
   - **iii.** स्पर्धक विद्यार्थ्यांचे एकाच वेळी दोन ठिकाणी सादरीकरण आले असेल तर त्यांना त्याच्या सोयीने (सुरुवातीला, मध्ये किंवा शेवटी) सादरीकरणाची संधी द्यावी.

## स्पर्धक विद्यार्थ्यांना सुचना

1. युवा महोत्सव नियमावलीनुसार ज्या–त्या स्पर्धेच्या ठिकाणी प्रत्यक्ष सादरीकरणासाठी महाविद्यालयाचा संघ सबळ कारणाअभावी वेळेत न आल्यास सदर संघाचे 5 गुण कमी करण्यात येतील व सदर संघास प्रती स्पर्धा रक्कम रु. 1,000/– इतका दंड आकारण्यात येईल. तसेच याबाबतचा दंड संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठाच्या बॅक खात्यावरती त्वरीत जमा करुन त्याची पावती सादर करावी. अन्यथा तो संघ स्पर्धेतून बाद ठरविण्यात येईल.
2. आपली तब्बेत (आरोग्य) व्यवस्थित असल्याची खात्री करुन घ्यावी. तब्बेत ठीक नसेल तर सादरीकरणाचा विपरीत परीणाम आपल्या आरोग्यावर होणार नाही याची काळजी घ्यावी.
3. दिलेल्या वेळेपूर्वी कमीत कमी १५ मिनिटे उपस्थिती असावी.
4. सादरीकरणापूर्वी आपला क्रमांक पुकारल्यानंतर स्पर्धक विद्यार्थ्यांनी आपले ओळखपत्र/प्रवेश पावती संयोजकाकडे जमा करावे.
5. स्पर्धेमध्ये कोणताही गैरप्रकार अथवा प्रमाद होणार नाही याची काळजी स्पर्धक विद्यार्थ्यांनी घ्यावी.
6. बेकायदेशीर नोंदणी,प्रवेश व सादरीकणाबाबत काही तक्रार उद्‌भवल्यास संबंधित विद्यार्थी, संघप्रमुख तसेच महाविद्यालयास जबाबदार धरले जाईल. व त्यांच्यावर विद्यापीठ नियमानुसार कारवाई केली जाईल.
7. सादरीकरणादरम्यान काही अडचण आल्यास विद्यार्थ्यांनी घाबरुन जाऊ नये. संघप्रमुखांच्या व आयोजकांच्या संपर्कात रहावे.

## संघप्रमुखांना सुचना

1. युवा महोत्सव नियमावलीनुसार ज्या–त्या स्पर्धेच्या ठिकाणी प्रत्यक्ष सादरीकरणासाठी महाविद्यालयाचा संघ सबळ कारणाअभावी वेळेत न आल्यास सदर संघाचे 5 गुण कमी करण्यात येतील व सदर संघास प्रती स्पर्धा रक्कम रु. 1,000/– इतका दंड आकारण्यात येईल. तसेच याबाबतचा दंड संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठाच्या बॅक खात्यावरती त्वरीत जमा करुन त्याची पावती सादर करावी. अन्यथा तो संघ स्पर्धेतून बाद ठरविण्यात येईल.
2. संघप्रमुखांनी आपल्या महाविद्यालयाच्या स्पर्धक विद्यार्थ्यांच्या सतत संपर्कात रहावे.
3. आपल्या महाविद्यालयाच्या स्पर्धकांची नोंदणी ही नियमानुसार आहे याची खात्री करुन घ्यावी. बेकायदेशीर नोंदणी, प्रवेश किंवा सादरीकरणाबाबत संबंधित विद्यार्थी, संघप्रमुख तसेच महाविद्यालयास जबाबदार धरले जाईल.
4. स्पर्धेपूर्वी विद्यार्थ्यांची बैठक घेवून पूर्वसूचना दयाव्यात. तसेच त्यांच्या अडचणी समजून घेवून योग्य त्या उपाययोजना कराव्यात.
5. स्पर्धेच्या वेळी आपणही आवश्यकतेनुसार स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित रहावे.
6. स्पर्धा सुरु असताना आपल्याकडून कोणत्याही प्रकारचा अडथळा येऊ नये याची काळजी घ्यावी. आवश्यकता भासल्यास संयोजकांशी Whatsapp/फोनवर संपर्क साधावा.

संपर्क –
ऑफिस : 0231–2609175, 2609475

संचालक,
विद्यार्थी विकास
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सादरीकरणाबाबत दयावयाचे हमीपत्र

(सर्व स्पर्धक आमच्या महाविद्यालयाचे नियमित विद्यार्थी आहेत याची हमी)

(सदर हमीपत्र महाविद्यालयाच्या लेटरपॅडवर जिल्हा व मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी ज्या त्या महाविद्यालयाकडे संघ / स्पर्धक नोंदणीवेळी स्वतंत्रपणे द्यावे.)

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचे कडून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणेसाठी दरवर्षी जिल्हा व मध्यवर्ती युवामहोत्सव आयोजित केले जातात. परंतु काही संघ/स्पर्धक विद्यापीठाच्या व यजमान महाविद्यालयाच्या नियोजनाप्रमाणे सादरीकरणासाठी दिलेल्या वेळेत/क्रमवारीने रंगमंचावर उपस्थित राहत नाहीत. त्यामुळे विद्यापीठ युवा महोत्सव समितीला आणि यजमान महाविद्यालयाला स्पर्धा वेळेत पार पाडणे अडचणीचे होते याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे.

दि. ............................................... रोजी ................................................................................................................................................................................... येथे होणा–या जिल्हा /मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये आमच्या महाविद्यालयातील संघ / स्पर्धक विद्यार्थी खालील कलाप्रकारात सहभागी होत आहेत.

1 ..................................... 2 .................................... 3 .......................................... (वगैरे)

आमच्या महाविद्यालयातील वरील कला प्रकारातील संघ / स्पर्धक विद्यार्थी हे विद्यापीठ समितीने/यजमान महाविद्यालयाने दिलेल्या वेळेवर व क्रमवारीप्रमाणे त्यांच्या कलाप्रकाराचे सादरीकरण करणेस बांधील आहेत.

यामध्ये आमच्या महाविद्यालयाच्या संघाकडून/स्पर्धकाकडून हलगर्जीपणा/कसूर झाल्यामुळे आमच्या महाविद्यालयाचा संघ/स्पर्धक संबंधित कलाप्रकारच्या स्पर्धेतून बाद केला जाईल, याची आम्हाला जाणीव आहे.

त्यामुळे आमच्या महाविद्यालयाच्या संघाने/स्पर्धकाने विद्यापीठ समितीने/यजमान महाविद्यालयाने दिलेल्या वेळेत/क्रमाने संबंधित कलाप्रकारामध्ये सादरीकरण केले नाही, या कारणावरून संबंधित स्पर्धेतून आमच्या महाविद्यालयाचा संघ/स्पर्धक विद्यापीठाच्या समितीने/यजमान महाविद्यालयाने बाद केल्यास आमची कोणतीही हरकत/तक्रार असणार नाही, म्हणून देत आहोत हे हमीपत्र.

| पुरूष संघव्यवस्थापक | महिला संघव्यवस्थापक | प्राचार्य |
| --- | --- | --- |
| सहीः———————— | सहीः————————— | सही व शिक्का |
| नावः———————— | नावः ————————— | |
| मो.नंः——————— | मो.नंः————————— | |